
संशोधक

डिसेंबर १९८८



इतिहासाचार्य वि. का. राजवाडे
संशोधन मंडळाचे त्रैमासिक

सं शो ध क

डिसेंबर १९८८ | वर्ष ५६ अंक ४

संपादक

प्रा. डॉ. प्र. न. देशपांडे
प्रा. डॉ. मु. ब. शहा
प्रा. व. ग. हजिरनीस

अंकाचे मूल्य
७ रुपये

' संशोधक ' त्रैमासिक

इतिहास-संस्कृती संशोधनाला वाहिलेले दर्जेदार त्रैमासिक गेली छप्पन्न वर्षे अविरतपणे प्रकाशित होत आहे.

जानेवारी १९८९ पासून वार्षिक वर्गणी रुपये ३५/- मात्र करण्यात आली आहे. या वर्षापासून प्रत्येक अंकाची किंमत रुपये १० राहील.

तहहयात वर्गणी जानेवारी १९८९ पासून रुपये ३००/- मात्र करण्यात आली आहे.

विशेष सूचना : आजीव वर्गणीदार व्यक्तीप्रमाणे संस्थांनाही होता येते. व्यक्तीसाठी आजीव वर्गणी दोन वर्षांत चार हप्त्यांमध्ये स्वीकारण्याची सोय केली आहे.

संपादक
' संशोधक ' त्रैमासिक
इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

•

मलपृष्ठावरील नकाशाचा संदर्भ ' महाराष्ट्रातील शेतीव्यवसाय ' या लेखात आहे. मुखपृष्ठावरील फोटो इनामगाव येथे मिळालेली ताम्रपाषाणयुगीन सांबराच्या शिंगाची कुदळी आहे. याचाही संदर्भ ' महाराष्ट्रातील शेती-व्यवसाय ' या लेखात आहे.

संशोधक त्रैमासिकासंबंधी केंद्र सरकारच्या नियमानुसार द्यावयाची माहिती

(१) प्रकाशन स्थळ	:	इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे.
(२) प्रकाशनाची मुदत	:	त्रैमासिक.
(३) मुद्रकाचे नाव	:	श्री. चिं. स. लाटकर, ४६१/४ सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणे ४११०३०
(४) प्रकाशकाचे नाव	:	प्रा. डॉ. प्र. न. देशपांडे, मुख्य चिटणीस, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे.
(५) संपादकांची नावे	:	प्रा. डॉ. प्र. न. देशपांडे, प्रा. डॉ. मु. ब. शहा, प्रा. व. ग. हजिरनीस.
(६) राष्ट्रीयत्व व पत्ता	:	भारतीय, चिटणीस, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे.
(७) मालक व पत्ता	:	इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे प्रकाशक.

पाटिलकीचे निवाडापत्र

डॉ. प्र. न. देशपांडे

मुर्टी मोडवे येथील पुरंदरे यांचेकडील कागदपत्रांचे दप्तर राजवाडे संशोधन मंडळाला दोन वर्षांपूर्वी मिळाले. त्यानंतर काही दिवसांनी मुर्टी मोडवे येथील मोरे पाटील यांनी उत्स्फूर्तपणे त्यांचेजवळ असलेली कागदपत्रे श्री. बाळासाहेब पुरंदरे यांचेमार्फत मंडळाचे स्वाधीन केली. ही कागदपत्रे चाळत असताना एक नमुनेदार निवाडापत्र दृष्टीस पडले. हे निवाडापत्र अस्सल असून ४३ फूट लांब आणि ७ इंच रुंद आहे. मोडी अक्षर दाणेदार व सुवाच्य असून कागद चिवट आणि किंचित बदामी रंगाचा आहे. हे निवाडापत्र शके १७०० चे म्हणजे इ. स. १७७८ चे असून सवाई

माधवराव पेशव्यांच्या नावे हा निवाडा दिलेला आहे. निवाडापत्र ४३ फूट लांब असल्यामुळे अनेक कागद एकमेकांना जोडून ते तयार केलेले दिसते. दोन कागदांचा जोड जेथे होईल तेथे 'लेखनसीमा' हा शिक्का पाठीमागील बाजूस मध्यभागी उमटविलेला आढळतो. त्यावरून निवाडापत्रे, वतनपत्रे किंवा महजर तयार करताना किती खबरदारी घेत असत याची कल्पना येते. निवाडापत्र जेथे संपते त्या ठिकाणी 'लेखनसीमा' ही समाप्तीमुद्रा अस्सलपणाची साक्ष देते. निवाडापत्राचा प्रारंभीचा सुमारे ३-४ इंचांचा भाग फाटलेला आहे. फाटलेल्या भागावर सवाई माधवराव पेशव्यांची मुद्रा असली पाहिजे.

निवाडापत्रामध्ये मुर्टी मोडवे येथील मोरे पाटील यांची पाटिलकी राजपुरे यांनी बळकाविली असताना मोऱ्यांच्या तक्रारीवरून चौकशी होऊन ती पुनः मोऱ्यांना कशी मिळाली याची तपशीलवार हकीकत आली आहे. 'येजीतखत', 'थलखत' इत्यादी कागद तपासून पेशवे निवाडा करीत असत. बलुतेदारांच्या साक्षींना विशेष महत्त्व असे. बारा बलुत्यांमध्ये जोशी, माळी, सुतार, लोहार, परीट, न्हावी यांचेबरोबर महार, चांभार यांचाही समावेश आहे आणि त्यांची नावे साक्षीदार म्हणून निवाडापत्रात नोंदलेली आहेत.

मुर्टी मोडवे या गावासंबंधी विशेष माहिती निवाडापत्रात आलेली आहे, ती प्रत्यक्ष पडताळून पाहण्यासारखी आहे.

वतनासाठी मराठेशाहीत सातत्याने झगडे चाललेले होते. तथापि ज्याचे वतन असेल त्याचेकडेच ते राहिले पाहिजे असा राज्यकर्त्यांचा कटाक्ष होता. शिवाजी महाराजांनी याबाबत जो दंडक घालून दिलेला होता तो मराठेशाहीच्या अखेरीपर्यंत चालू असावा. या निवाडापत्रावरून मोऱ्यांना त्यांचे पाटिलकीचे वतन, राजपुऱ्यांचा हक्क 'खोटा' ठरवून कसे मिळाले ते लक्षात येईल. मराठेकालीन मुलकी न्यायव्यवस्थेचा अभ्यास करण्यास हे निवाडापत्र अभ्यासकांना उपयुक्त वाटेल.

निवाडापत्र

राजमान्य राजश्री माधवराव पंडीत प्रधान मानाजी बीन खंडोजी मोरे थोटे मोकदम मौजे मोढवे कर्यात सासवड सु॥ तीसा सबैन मया आलफे शके १७०० वीळंबी नाम संवत्सरे तुम्ही हुजूर कीले पुरंधर येथील मुकामी येऊन वीदीत केले की मौजे मजकूरचे मोकदमीचे वतनाविसी आमचा व जानोजी बीन नाईकजी व राणोजी बीन मताजी राजपुरे यांचा कजीया लागला होता त्याची मनसुबी कर्यात मजकूरचे देशमुख व देशपांडे यांनी गोतथल मौजे करंजे ता॥ नीरथडी प्रां॥ पुणे येथे नेमुन दील्ही थली आनंबा ? हरदुवाद्यांचे रजावंदीने गोत जमा होऊन त्यांणी व आम्ही तकरीरा व जमीन येऊन राजीनामे लेहुन दील्हे त्यावरून गोतांनी दोघा वाद्यांपासून साक्षीदार

पांढर व जांवर गांवकरी यांची नावानीसी लेहुन घेऊन त्या साक्षीदारांस खाली आणून दशरात्र क्रीयेचा नेम करून साक्षी घेतल्या त्यात मोकदमीचे वतन आमचे मोरेथोटे याचे ऐसे साक्षीदारानी लेहुन घेऊन क्रीया केली कराराप्रों क्रीयेस पार पाडीले वतन आमचे ऐसे खरे जाहाले राजपुरे खोटे जाहाले त्यांणी आपणांस येजीतपत्र लेहुन दील्हे त्याप्रमाणे गोतानी थलपत्र करून दील्हे आहे ते साहेबीं मनास आणुन भोगवटी यास नीवाड पत्र करून दील्हे पाहीजे म्हणुन वीनंती करून पांढरीचा दशरात्र क्रियेचा कतबा व येजीतखत माणकोजी बाजी जोसी-कुलकर्णी मौजे मजकूर यांचे बीमनमानीसी व साक्षीदाराच्या साक्षीनीसी आहे ते व गोताचे थलपत्र ऐसे तीन कागद आणुन दाखवीले त्यापैकी येजीत खतातील मजमुन——बीतपसीले.

येजीतपत्र शके १७०० वीलंबी नाम संवत्सरे भाद्रपद शुद्ध नवमी वार रवीवार ते दीवसी मानाजी वाद खंडोजी ईब्रीन धर्मोजी व समस्त उपनाम थोटे मोरे पाटील मोकदम मौजे मोंढवे कर्यात सासवड यासी जानोजी बीन नाईकजी व राणोजी बीन मताजी राजपुरे व समस्त भाऊ राजपुरे वस्ती मौजे मजकूर मगमाार सु।। तीसा सबैन मया व आलफ सन हजार १०८८ कारणे येजीतपत्र बेदावा लेहून दील्हा ऐसा जे मौजे मजकूरची पाटीलकी मोकादमी आमची म्हणून तुम्हांसी कजीया करीत होतो सबब तुम्ही आम्ही भांडत मग मजकुरास गोत काये व तव जमीदार राजश्री नारायणजी नाईक जखताप देशमुख व राजश्री महीपतराव व त्रींबक पुरंदरे देशपांडे मगमार याजपांसी फीर्याद गेलो ! त्याजपासी तुम्ही व आम्ही आपमाने वर्तमान सांगीतले त्यांणी उभयेतांचे मनास आणून राजीनामे घेऊन वर्तणुकेस जामीन मागीतले त्याजवरून तुम्ही व आम्ही जामीन दील्हे त्याची नांवे बीतपसीले.

तुम्ही मोऱ्याजी जामीन धील्हे मोकदम मौजे वालेसर कार्यात सासवड	आम्हां राजपुरी याचा जामीन मोकदम मौजे धीयें कर्यात सासवड
१	१

उभयेतांस जामीन सदरहू उभयेता मोकदमास घेऊन मगदर थलास उभयेतांस पंचाईत थल मौजे करंजे सोमयाचे ता। नीरथडी प्रां पुणे येथील थलास आपले थलपत्र घेऊन दोघे आमीन मालोजी जगताप देशमुख व आपाजी बागाजी मोढीत करनीग देशपांडे हे आमीन समागमे देऊन तुम्हांस व आम्हांस परस्थली पाठवीले तुम्ही व आम्ही दोघे आमीन सुधा येऊन हाजीर जाहालो तेथील श्रीसोमयाचे थल नाईक व समस्त पुजारी याणी सोमयाचे करंज्यास लगते भोंवर गांव आहेत तेथील वगैरे गांवचे गोत मेलवीले त्याची नावानीसी बीतपसीले

१ सोमाजी बीन येशवंतराव काकडे दीनकरराव पाटील मोकदम मौजे नींबुत प्रां पुणे	१ मैरान खंडेराव बेनसरे दी।। राजश्री धोंडो मलहार पुरंदरे देशपांडे मा।। मजकूर—

१ नींबाजी बीन बहीरजी लंकडे चौगुले मौजे माार प्रांा माार

१ गोडाजी बीन हैबतराव पाटील जखताप नीमे मोकदम मौजे मुरूम ?

१ गोंदाजी बीन रामजी मोठे चौगुले मौजे कुरूम प्रांं पुणे

१ संभाजी बीन मंबाजी पाटील होलकर मौजे होल प्रांं पुणे

१ बाबाजी बीन नंदाजी थलकरी कुणबी मौजे बेन_

१ सीवाजी बीन रामजी पाटील गाडेकर मौजे चोपडन प्रांं सुपे

१ खंडोजी बीन ममाजी खराडे दीाराजश्री नागोजी राऊत मोकासी मौजे मजकूर

१ बाळाजी बीन मानाजी देशमुख जगधाप कसबे सासवड

१ बाबूराव आपाजी प्रभु दीाा राजश्री महीपतराव त्रींबक पुरंदरे देशपांडे प्रांं सासवड

१ शाहाजी बीन उदाजीराव काकडे दीनकरराव पाटील मौजे नींबुत प्रांं पुणे

१ रामोजी बीन राणोजी पाटील नीगडे मोकदम मौजे गुठींचे प्रांा सीरवल

१ सुकजी बीन बापुजी पाटील मौजे गुठीचे प्रांं सीरवल

१ कोंडाजी बीन सखोजी करणवर चौगुले मौजे गुठींचे प्राा मार

१ बहीरजी बीन चींतोजी पाटील गाडेकर मोकदम मौजे वांकी प्रांं सुपे

१ राणोजी बीन येसाजी दरेकर चौगुले मौजे वडगाव प्रांं पुणे नीा। नींबालकर

१ जानोजी बीन सीदोजी पाटील गाडेकर मौजे वाकी प्रांं माार

१ खंडोजी बीन बाजी नाये पत्रे थल वाई मौजे वांकी प्राा मार

१ मानाजी बीन सुभानजी पाटील गाडेकर मौजे वांकी प्राा मजकुर

१ अंतोजी बीन नाईकजी पाटील रणनवरे मोकदम मौजे रांम प्राा सासवड

१ लखजी बीन सातापावाणी चौगुले मौजे रांम प्राा माार

१२

सदरहु गावचे गोत व थलकरी सजा नाईक याणी श्रीच्या पारावर बसोन तुमचे व आमचे वर्तमान वीचारीने त्याजपासी आपापली हकीकत उभयेतानी जाहीर केली त्यांणी मनास आणून राजीनामे व जामीन कतबे व तकरीरा मागितल्या त्याजवरून उभयेतानी राजीनामे घेऊन जामीन दील्हे त्यांची नावानीसी

तुम्ही जामीन दिल्हा मोकादम मौजे नाझरे ताा कऱ्हेपठार प्रांं पुणे	आमचा जामीन मोकदम मौजे मुडले प्रों सुपे
१	१

सदरहू उभयेतानी जामीन थलकरी यांस घेऊन तकरीरा लेहून दील्हा त्यात करीरीतील कलमे सारांश मोरे मोकदम यांणी तकरीर दील्ही त्यातील

१ आपला मुळ पुरुष जाखोजी व दामोजी पाटील थोटे मोरे ढवापुरीतून आले

बराबर गुडीं होती चरणी करीत आले ते मौजे मुरठीच्या रानात बीरोबाच्या सोंडेसेजारी वाडा घालुन राहीले मग वेढा उतरून आलीकडे आले मीवाचें मोठे जुने होते तेथे नवीन जागा पाहुन राहिले तेथुन गावाचे नाव मौजे मोढवें परंतु पहिले केणारी याचे मोढे होते.

कलम

१ मुरठीची वाडी मोढवें काही दीवस सीरवला खाले मोडले मग बारागाव सासवडाखाले वर्ततात परंतु ते समई जालेजीचा पुत्र दादजी व संभाजी पाटील मोऱ्यापाटील मीमरीत होता त्यास पुढे दादाजी पाटलाचा पुत्र मांवजी पाटील मीकरू ! लागला गांव चांगला जाणावला मग अवर्षण पडले भांडु लागले

कलम

१ मावजी वडील दाद पाटलाचा पुत्र धाकटे बुडचा संभाजी बीन गणोजी यास दोन्ही वतने येकत्र करू वाटुन घेऊ ऐसे म्हणता व तट घातला मग रामोजी राजपुरा यास कारभार सांगितला ×× घर व सेत गावाजवल दील्हे

कलम

१ मावजी पाटील काम मुळे मावकंत चारणीस गेला आणी पाटीलकीस रामोजी राजपुरा ठेवीला मावजी पाटील तीकडे मेला.

कलम

१ सोनजी त्याचा पुत्र वाचुन माघारा आला तो गावावर भाऊबंद नाहीत व रामोजी राजपुराही नाही येक दोन घरे होती ती मुरठीस होती तेथे सोनजी मुरठीस गेला दोन रोज मालीयाच्या घरी राहीला मग सोनजी बीन मावजी नायेगावास गेला तेथेच ठरला

कलम

१ सोनजी बीन मावजी नायेगावी राहिला तो पुढे वस्ती रामोशी राजपुरा याणे भाऊबंद मेलहून वस्ती केली परंतु ज्याचा कारभार जो करीतो आडवे कशास यावे.

कलम

१ नींबालकर हकीम होता मग त्याणे सोमाजी राजपुरा बाकी बदल नेऊन मोकदमीचा कागद घेतला–ढमढरे जामीन देऊन गावास आला आणि खाल्या खंडोजी मोऱ्या यास सांगीतले की तुझ्या गाई आजपावेतो वाल्या आता आपल्या राखणे

कलम

१ खाल्या खंडोजी मोऱ्या व गणोजीबीन दामोजी धाकटे घरचा भाऊ त्यास बोलला की पाटील की गुंतली तुला कलेल तैसी सोडवणे मग गावात वरगणी करून बाणगोजीच्या हवाली करून नीबालकराचे खतची सोडवीली

कलम

१ मोकासी आंवो * दोघे भाऊ मुरठीस होते ते त्यांची बोलाचाली जाहाली तो रुसुन मोढवीयास आला जागा जागा आंकुस (?) मागु लागला मग धाकटे घरच्या भावाच्या वाडीयाच्या डाव्याआंगे राहात होते ती जागा मोकळी करून मोकासी आवोलीयास दील्ही ती जागा वाणगोजी राजपुरा याचा बाद संताजी राजपुरा त्याचा वडील सोमाजी राजपुरा * दूरचा भाऊ म्हणून आला त्याजला मोकाशा बदल वाडा आईता होता तो दील्हा

कलम

१ श्रीमंत कैलासवासी बाळाजी पंतप्रधान कौल गावास जाहाला कोकरीयांस मोकासा जाला देवजी बीन बरवाजी व पोयाजी बीन बरबाजी मोरे व नामाई मोरी व बाजी लेक घेऊन मावजी पाटील याची बायको वडील घरची गावावर आली ती मोकदमीच्या घरावर नांदली गांवचे कामकाज संतवा व देवजी व हारबाजी मोरे करीत होते ते मायेने व ममतेने सांत वर्षे होती मग गांव ओस पडीला

कलम

१ श्रीमंतापासी मलहार पंतदादा व आबाजीपंत तात्या पुरंदरे याणी अर्ज करून गांव मोकासा सीदोजीराव ताकडे दील्हा तो कौल संतावा राजपुरी व देवजी मोऱ्या धाकटे घरचा यांणी घेतला आपण घ्यावा तरी आसीम कौल कीतेक होतील

कलम

१ कोकरीयाच्या आलाकत बाजी मोऱ्या आला होता पाटीलकी करावयाच्या तला ? शांत होता तो संतवा राजपुरी बोलीले जे आपले भाऊबंद मेलवा मीही आपले मेलवीतो तो चाकरीस जाणे तो गेला त्यांस कोकरीयाचा आमल जालीयावर बाजी मोऱ्या आला

कलम

१ सीदोजीराव त्याच्या आमलांत बाजी बीन कोंडजी मोऱ्या गावास आला जाहीरणा करून मौजे मुरठीस बाजी पाटील जगथाप यास सांगितले त्याणे जाब दील्हा की वोवांडी यांणी पाटीलकी कैसी करीसील मुले माणसे घेऊन येणे तो मुले माणसे घेऊन आला तो मृत्यु पावला

कलम

१ सोनजी बीन सांवजी मोऱ्या श्रीमंताच्या कौलातच आला त्याणे बाजी मोऱ्या याचा ईश्वंत आईकोन * घरी नातवानी आणि भांडावयास उभा राहातो तर त्याची आवस्ता ऐसी जाहाली याजकरीता राहीले बाजी मोऱ्या याची बायको काही दीवस गावावर राहून गेली

कलम

१ मोकदमीच्या वाडीयावर नागोजी राजपुरे याणी दाहा खण मालवद बांधु लागला त्यासमई नाईकजी राजपुरा म्हणो लागला जे नागोजी बाबा * * कोणाचे जागीयावर बांधीतोस तो न आईके मग आपण दोही दील्ही बहीरजी बाबा देशमुख गांवास आले त्याजपासी उभे राहीलो हकीकत जाहीर केली त्यांणी मुरठीकर पाटील बोलाऊन इनसाफ करून पांढरीच्या मुखे करून आमचा घर वाडा आमच्या हवाली केला

कलम

१ खलवीलांचे थल पाटीलकीचा ईनाम राजपुरे खात होते ते थल आपले म्हणुन द्वाही देऊन श्रीमंत राजश्री घोंडोबा आपा पुरंदरे देशपांडे याजपासी उभे राहीलो त्यांणी राजपुरे यांस कतबा मागीतला की खरे करून देणे मग नागोजी राजपुरे व नाईकजी राजपुरे यांणी उत्तर दील्हे जे आजपावेतो खादले आता राहीले ते ईनामतील * नेऊन श्री बहीरंवाचे घेऊन बांधीले

कलम

जानोजी बीन नाईकजी राजपुरे याची कलमे बीतपसील—

१ आपला वडील मौजे मदुर प्रां वाई देश येथून आला राजपाटील मौजे मोंढवे येथील पाटीलकी मेलवीली

कलम

१ पहीला मारा बाणाजी राजपाटलाचा पुत्र चौथा होता त्याजला फेणारी याणी मारीले

कलम

१ दौलत मंगलास जाऊन हकीम रायाराव त्यास जाहीर केले त्यांणी आभटे दील्हे की मुत्त्यांचा मारा करणे मग गावांस येऊन उंबर वोढीयांत उंबराखाली तुकोजी केणारी जमाव करून येत होता त्याची पानत (?) आणुन त्याजवरी तुकोजी केणारी मारीला त्याचे सीर कापून आणीले.

कलम

१ तीस रामराजा पाटील वीज्यापुरींचा करीस होता वीज्यापुराहून आला की केणारीस बान (बाण) मारा करीतील म्हणून आले ते येते वेळेस वडगांव प्रां पुणे येथे आले वडगांवी माउस (मावस) भाऊ रेव पाटलाचा रामजी जर्देकचाले याचा पुत्र पीकजी व जगजी मुकमेस बोलावीला.

कलम

१ रामजी राजपुरे याणे पीकजी व जगजीला चाले.

कलम

१ केणारी यांणी तीसरा मारा गावावरी केला राजपाटलाचा पुत्र वीठोजी याजवर आठरा (१८) जखमा चढल्या रामोजी पाटील याचा पुत्र त्रींबकजी व सोनजी ऐसे तीघे जण पडले:

कलम

१ थोटे मोरे बहीरोबाचे सोंडेंस वाडा घालून राहीले होते ** गेले तेव्हा आपले वडीलानी त्यांस चौगुलकी मौजे मार चा घेऊन राहावीले.

कलम

१ राजजी व रेवजी पाटील राजपुरे यांणी मोरे यांस चौगुलकी दील्ही.

कलम

१ रामोजी पाटीलकी करीतो तो आथपावतो राजपुरे पाटीलकी करीत आहेत.

कलम

९

येणेप्रमाणे तुमची कलमे सोला व आमची कलमे नव सदरहू प्रमाणे कलमे नीवडून मांडली त्याची पुरसीस गोताने तुम्हास व आम्हांस केली. की आपापली कलमे कोण्हांच्या मुखे खरी करून घ्याल त्याप्रमाणे लेहून देणे त्याजवरून तुम्ही मुचलका दील्हा जे आमची कलमे नीवडून काहाडली ती पांढरीयाच्या व जांवर गावच्या व बाराबलोत्यांच्या मुखे खरी करून घेऊन देऊ तरी भांडण भांडतो ते खोटे तुम्ही मुचलका लेहुन दील्हा जे आमची कलमे माहाडली (मांडली) ती पांढरीच्या व बारा बलोत्यांच्या व जांवरगावच्या मुखे खरी करून घेऊन देऊ तरी भांडण भांडतो ते खोटे. याप्रमाणे उभयेतांनी कतबे लेहुन दील्ही त्याजवर श्रीच्यास्थली शके १५९३ खरनाम संवत्सरी मार्गसीर्ष वद्य येकादसी वार—ते दीवसी मौजे मारची पांढर व बाराबलुते व जोवर गांव लागते व थलकरीस जानायेंक गोत मायेवत व जमीनदार यांणी आणुन त्यास गोही पुसीली त्यास श्रीच्या देवळात घातले त्यांणी श्रीचा बे * आंगारा मस्तकी घेऊन तीर्थस्नाने आगोधर करून प्रथम वदले त्यांची नावे तौ—

१ माणकोजी वाजी वाघ जोसी कुलकर्णी. उमर वर्षे ३२,

१ मलहारजी बीन खंडमाली उमर वर्षे ५५

१ जनकमाली बीन जावमाली बनकर उमर वर्षे ४०

१ कान्होजीबीन कवजी सुतार उमर वर्षे ५०

१ सेठी बीन खंडु परीलु उमर वर्षे ४५

१ जानोजी बीन माणकोजी गुरव उमर वर्षे ३५

१ कान्होजी बीन रामजी सालवी गुजार उमर वर्षे ४५

१ संभाजीबीन जीवाजी नाहावी आतकरी उमर वर्षे ४५

१ धोंडजी बीन देवजी सुतार उमर वर्षे २५
१ रत्नोजी लोहार उमर वर्षे ४५
१ राघोजी वा। सुभानजी लोहार उमर वर्षे ३५
१ भीकाजी वा खंडोजी परीट उमर वर्षे ४०
१ ठवु मेहतर बीन भीला मेहतर चांभार उमर वर्षे ६०
१ नींबराऊत वा। सलाराऊत मांग उमर वर्षे ६५
१ नींबराऊत बीन केरराऊत मांग उमर वर्षे ८०
११

१ दापजी बीन धामोजी नाहावी आतकरी उमर वर्षे ५५
१ पुंजनाक बीन ढग नावु माहार उमर वर्षे ४५
१ मालनाक बीन आपनाक माहार मोरे उमर वर्षे ५५
१ गुणनाक बीन बोदनाक माहार उमर वर्षे ७०
१ म्हसनाक बीन सुबानाक माहार उमर वर्षे ८०
१ झाडनाक बीन चावनाक माहार मोरे उमर वर्षे ५०
१०

येकुण आसामी येकवीस व जांवर गांव लगते मौजे मा।रास तेथील पाटील याची नावानीसी बीतपसीले

४ मौजे मुरठी प्रो सुपे
१ सेव्याजी बीन सुभानजी पाटील जगदले उमर वर्षे ४०
१ सीदोजी वाद बोवाजी प्रो जगदाले
१ नीमोजी बीन सीदोजी प्रो जगदाले वर्षे ५०
१ हैबती वा। मलहारजी माघाडे मजरे मोरले मौजे मा।।र वर्षे ४०
४

२ मौजे नावेली
१ भवानजी बीन येसाजी पा। म्हसके वर्षे ३५
३ मौजे भोगवडी प्रा। पुणे
१ माहादजी बीन रामजी भोसले वर्षे ४५
१ जोगोजी बीन मुराजी भोसले वर्षे ४५
१ येसाजी वा। सोदोजो होनरा चावणी चौगुले उमर ७५
३
५

येकुण नावानीसी येणेप्रमाणे श्रीच्या महास्थली हजीर मज्यालसीत वदले त्याचा कयास गोतकाये वतव सजानाईक याणी लोक भंवर गांव समाकुल पांढरी येणे प्रो

वदली जे जाखोजी व दामोजी थोटें मोरे बहीरोबाच्या सोंडेस येऊन मुरठीच्या रानांत राहीले तेथे जाखोजी मृत्यु पावले त्याचा पुत्र दापजी व जाखोजीचा भाऊ दामोजी हे दोघे वेढा उतरून × × मोढे होते तेथे येऊन राहीले आणी मोढवें वसविले कालीवर पांढरी त्यांणी केली गांव मुरठीचें रान तोडून वसवीले पांढरी केली त्यास दापणीचा पुत्र मावजी पावेतो दोन डोया मोकादमी केली होलीस पोली-मानपान भोगवटा पाटीलकी व चौगुलकी दोन डोया चालली मग दामोजीचा संभाजी व दापजीचा पुत्र मावजी हे दोघे मुकदमीकरीता व चौगुलकीकरीता भांडु लागले तो रामोजी राजपुरा मदुरकर प्रां। वाई तेथून येत जात आसे त्यावरून × × वोलख होती तो भावाभावाच्या कटकटीमुळे रामोजी राजपुरा मदुरकर यांस कारभार सांगीतला मांवजी मावलांत देशावर गेला त्याजवरून रामोजी राजपुरा पाटीलकीचा कारभार करू लागला पाटीलीबद्दल मानपान त्याजपासी राहीले रामोजीचा पुत्र वीठोजी वीठोजीचा पुत्र सोमाजी राजपुरा कारभार करीत आसतां गांवचे बाकीबद्दल नीबालकर हकमाने नेल आणी पैकीयाकरीता तगादा केला मग त्याणे ढमढेरी यास जमान घेऊन गांवास आला आणि खाल्पा खंडोजी थोटे मोरे मावजीच्या घरातील भाऊ त्यास सोमाजी राजपुरा बोलला जे ढमढेरीयास खत मोकदमीचे देऊन आलो तर तुम्ही ढमढेरीयास पैका देऊन मुकदमीचे खत सोडवणे आणी आपली मोकदमी आपली करणे आजपावेतो तुझ्या गाई वालल्या आता माझ्याने वावत नाहीत तरी आपली मोकदमी करणे म्हणुन काठी हाती दील्ही खंडोजी कारभार करू लागला त्याजवर खंडोजीने पैका वारून आपली मोकदमी ढमढेरी याचे खतची सोडवावी तो धाकटे घरच्या गणोजीस कुनखडीस खबर कलली की खाल्या खंडोजी पाटीलकी करू लागला मग त्याणे येऊन कठकठ केली की तीराईताच्या घरी पाटीलकी ठेवीली आसतां गुलाबराव यांस कारण काये ऐसे म्हणून भांडु लागले मग उभयेतानी मीलुन सोमाजी राजपुरा याचा भाऊ लातुरचा हणगोजी राजपुरा गांवात नांदत होता तो शाहाणा माणूस म्हणून त्याचे हवाली पाटीलकीचा कारभार केला रामोजी राजपुरा तीराईतपणे कारभार करीत होता तैसा तु करणे ऐसे म्हणून कारभार हणगोजीस सांगीतला त्याजवरून हणगोजी कारभार करू लागला मानपान वगैरे त्याजकडे वैवटु लागले याउपरी ढमढेरीयाच्या पैक्याकरीता गणोजी मोऱ्या हणगोजी राजपुरा याणे वद * * चाले याणे पैके माले मागुन केला त्यापैकी यावर खत नीघेना मग आणखी गांवावर पटीवरगणी करून पैका केला तो ढमढेरीयास देऊन हणगोजी राजपुरे याणे खत काहाढुन (काढुन) आणीले तेथून हणगोजीचा पुतण्या सीवजी व त्याचा पुत्र मालोजी राजपुरा पावेतो मानपान वगैरे तीन डोया चालले त्यांत कैलासवासी श्रीमंत बालाजीपंत नानासाहेब पंतप्रधान यांच्या मौलांत बाजी मोरे जाहीरणा करून मृत्यु पावले पुढे होनाजी मोरे याणी ईजामास द्राही देऊन पाडीले मग मोकदमीच्या वाडीयावरी नागोजी राजपुरे याणें मालवद बांधीले तेथे

होनाजी मोरे यांणी द्वाही देऊन कजीया केला तेव्हा बहीरजी बाबा देशमुख यांणी पांढरीच्या साक्षी वरून पंचाईत केली तो वाडा मोऱ्याचासा ठरला त्याजवरून वाडा मोरीयास दील्हा ऐसे पांढर व बाराबलुते व जावर गाव थल श्रीच्या सजानाईक हजीर मज्यालसीत वदली यावरी गोतानी हे पांढरीचे व जांवर गावचे पुरसीस मनास आणून पंचाईत मते धर्म न्यायेनीवाडा केला त्यास तुमच्या कलमाची साक्ष लेहून दील्ह्याप्रमाणे पुरली आमच्या कलमाची साक्ष पुरली नाही यांत तुम्ही पुरातन वतनदार खरे जाहाला आम्ही तुमच्या हाताखाली तीराईतपणे राहून तुमच्या आज्ञे-प्रमाणे कामकाज काही येक दीवस करीत होतो तें तीराईतपणा सोडून मालक पाटील आम्ही म्हणोन तुमच्या मोकादमीसी मौजे मजकूरासी भांडत होतो ते आम्ही खोटे जाहालो तुमची पाटीलकी पुरातन तुम्ही करणे मौजे मारच्या मोकादमीसी आमचा काही दाखला राहीला नाही तुमच्या घरभावाच्या कजीया मुले आम्ही तीराईत पाटीलकीचे कामकाज करीत होतो सबब तुमच्या वतनासी खलेल केली होती त्यास तुमच्या घरभावाची समजुती जाहाली सोमयाचे करंजे यास्ताली समाहून पांढरी मौजे मोढवे कर्यात मजकूर व जांवर गावच्या साक्षीनीसी नीवाडा होऊन मौजे मारची मोकदमी तुमची तुमचे दुमाला करून तुमचे नावे नीवाडापत्र करून थल मजकूरचे शके १७०० विलंबी नाम संवत्सरी श्रावण वद्य त्रयोदसी गुरुवारी करून दील्हे असे त्याजप्रमाणें तुमची मोकदमी तुम्ही करणे तुमच्या मोकदमीसी आमची नीसबत काही राहीली नाही बरहक ईनसाफाचे सईने आम्हीं कायेल होऊन खोटे जाहालो तुम्ही खरे जाहाला आम्ही आपले जागा कायेल होऊन गोताच्या साक्षीने तुम्हांसी येजीत खत बेदावा लेहून देतो ऐसा ठराव करून जमीनदार व गोत थलकरी सजा नायेकांच्या साक्षीने आपण आपले राजी रजाबंदीने तुम्हांस येजीत पत्र वेदावे लीहून दील्हा आम्ही आगर आमचा वंशज आडनावाचा राजपुरा उभा राहून दावा सांगेल तो खोटा दरोगबातल आसे यापुरी आमच्या नावे मोठे पाटीलकी समंधे कागदीपत्री मोकदम व पाटील ऐसे नाव आपल्या वडीलांचे राजपुरी याचे जेथे आसेल गोही साक्ष खतपत्र कर्ज वा लगांव समधी घेतले आसेल रोखा फारकती वगैरे सोयऱ्या धाईरी याणी कागद पत्र व महजीरी गोंही मोठे वडील कर्णी यांच्यां दफ्तरी व जामीनदाराच्या कबाजणी यांत हर मोठे मोकदम पाटील म्हणोन लीहीले आसेल त्याचा वारसा करून भांडण भांडणार नाहीत नावे रद आसेत तुमच्या मोकदमीसी भांडावयास आर्थाआर्थी संमंध राहीला नाही आपण आथवा आपल्या आडनावाचा राजपुरा आपला भाऊ हर कोण्ही तुम्हास भांडेल तो दीवाणचा गुन्हेगार व गोताचा खोटा हे येजीत पत्र लेहून दिल्हेसबी

बीन माणकोजी जीवाजी
वाद जोसी कुलकर्णी मौजे
मार भग मार

गोही

१ तुकोजी बीन कृष्णाजी वाद मोडे पाटील मौजे मसुरणे प्राा इंदापुर
(खूण नांगर)

१ सीदोजी बीन बालोजी दलवी पुजारे श्री म्हसको वीर प्रांा पुणे

१ खंडोजी बीन रखमाजी येलेऱ्यान मौजे बोरी प्रांा सीरवल

१ बुवाजी मणचेरयान वाा मौजे खडेबुत प्रो सीरवल.

१ राणोजी बीन खलोजी रांगोले रयान वस्ती मौजे सुरवडे प्रो सीरवल

१ डोंगरोजी बीन जोगोजी आभंगराव मोकदमानी मौजे आंब्रोरे प्रो सीरवल.
(खूण नांगर)

१ दापजी बीन येशवंतराव आभंगराव पाटील मौजे पीपरे प्रो सीरवल

१ माधवराव जनार्दन वाद कुलकर्णी जोतीशी मौजे आहीरे व मोरवे प्रो सीरवल
मौजे वावरत ताा माारसरकार हु. जुनर

१ कुनजी बीन चींगोजी पाटील बाजकर मोकादम मौजे माार
(खूण नांगर)
बीा सीवराम त्रींबक जोसी कुलकर्णी मौजे माार
लुकनाम वाा जमनना माहार जाधव मौजे माार.

९

१ आवजी बीन भीसे

१ सुमाजी बीन संताजी भीसे

१ यलोजी बीन भीवा भीसे

१ आगनोजी बीन राणोजी भीसे

४

मोकदम मौजे कांबलेसर प्रो फलठण
(खूण नांगर)
बीरोजी बीन माणकोजी पाटील भुंजारराव मोकदम मौजे आंदोरी प्रो सीरवल.
(खूण नांगर)
सीदो वीठल देशमुख कर्णी प्रो फलटण
पत्रा प्रो साक्ष सेकाजी पाटील धो अढलराव मोकदम मौजे खडे बु।। प्रो सीरवल.
(खूण नांगर)
बीाा सीदोची मणाजी जोसी कुलकर्णी मौजे खडे बु.।। प्रो सीरवल
बी।। धोंडो कासीराव घोडके जोसी कुलकर्णी मौजे खडे बु।। प्रो सीरवल
हैबतराव बीन रघोजी मौजे चौगुले खडे बु।। प्रो सीरवल
बीरोजी बीन सुभानजी सालोखे नाहावी मौजे खडे बु।। प्रो सीरवल

एकुण येजीत पत्र—येणेप्रमाणे येजीत पत्र व साक्षीदार दशरात्र क्रीयेस पार पडल्याचा फतवा व गोताने तुम्हा मोरे थोटे यांची मोकदमी खरी म्हणोन थलपत्र

करून दील्हे ते ऐसे तीन्ही कागद पाहून करंज्याचे थली गोताने साक्षीदार आणून दशरात्र क्रीयेचा नेम करून साक्षी घेतल्या त्यात मोकादमीचे वतन तुमचे मोरे थोटे याचे ऐसे साक्षीदारानी लेहून घेऊन क्रीया केली कराराप्रमाणे क्रीयेस पार पाडीले वतन तुमचे खरे जाहाले राजपुरे खाटे पडीले हे जाणून तुम्हावरी कृपाळु होऊन हे नीवाडा पत्र सादर केले आसे तरी मौजे मोढवे येथील मोकादमी वीसी तुम्हां बराबर राजपुरे वाद सांगत होते ते गोतांत करंज्याचे थली खोटे जाहाले तेथील थलकरी याणी तुम्हांस थल पत्र करून दील्हे त्याप्रमाणे राजपुरे याणी तुम्हांस येजीत खत लेहुन दिल्हे असे त्याबर-हुकुम मौजे मााहचे मोकदमी व मोकदमी संमधे ईनाक व मीरासीची सेते व घर वाडे व मानपान हक ×××× सुदामत चालत आल्याप्रमाणे तुम्ही वडीलाचे पुत्रपौत्रादी वंशपरंपरेने आजमावुन सुखरूप राहाणे तुम्ही मोकदमीचे वतनास खरे जाहलेत सबब तुम्हाकडे जीवनमा ×× सरकारची हरकी रुपये २००० दोन हजार रुपये करार केले ते सरकारात जमा जाहाले आहेत जाणीजे छ२५ रमजान आज्ञाप्रमाण.

—लेखन सीमा

धेनुकाकट महाराष्ट्रातील एक प्राचीन महानगर

डॉ. हरिहर ठोसर,
एल्फिस्टन कॉलेज, मुंबई

'धेनुकाकट' हे स्थलनाम महाराष्ट्रातील कार्ले, नासिक, शेलारवाडी, कान्हेरी आणि पितलखोरे येथील प्राचीन लेणीतील २० ब्राह्मी दानलेखात नमूद करण्यात आलेले आहे. हे आलेख इ. स. पू. दुसऱ्या शतकापासून इ. स. च्या तिसऱ्या शतकापर्यंतच्या कालातील होत. लेख त्रोटक असल्यामुळे काल किंवा स्थलनिश्चितीस उपयुक्त ठरणारी माहिती त्यात नाही. त्यामुळे उच्चारसाधर्म्याच्या आधारे डॉ. भगवानलाल इन्द्रजी, बुल्हेर आणि रा. गो. भाण्डारकरांनी त्यांची निश्चिती आंध्र प्रदेशातील सातवाहनांची दुसरी राजधानी असलेल्या 'धान्यकटक' ऊर्फ धरणीकोटा या स्थानाशी केली होती

याविषयी आजवर कुणीही दुमत व्यक्त केलेले नसल्यामुळे प्रस्तुत लेखकाने या समीकरणावर आधारित एक शोधनिबंध भारतीय पुराभिलेख परिषदेच्या गुवाहाटी सम्मेलनात सादर केला.[१] त्या वेळी चर्चेच्या ओघात बऱ्याच संशोधकांनी, आणि विशेषतः आंध्र प्रदेशातील पुराभिलेखतज्ज्ञांनी या स्थलनिश्चितीविषयी साशंकता व्यक्त केली. महाराष्ट्रातील २० शिलालेखांत आढळणारे हे स्थलनाम आंध्र प्रदेशात कसे असू शकेल याविषयी मनात शंका होतीच; इतर संशोधकांनी तेच मत व्यक्त केल्यामुळे ती पक्की झाली. उपलब्ध साधनांचा सूक्ष्म सखोल आणि तुलनात्मक अभ्यास केल्यानंतर लक्षात आले की धेनुकाकट हे महाराष्ट्रातच होते. ते नक्की कोणते याची चर्चा प्रस्तुत लेखात करण्यात आलेली आहे.

'धेनुकाकट' या स्थलनामाची निश्चिती करण्यासाठी उपयुक्त ठरू शकेल अशी माहिती वरील एकाही शिलालेखात नाही. त्यामुळे शिलालेखाचे प्राप्तिस्थान हीच मुख्य कसोटी गृहीत धरून या स्थलाचा शोध घेणे क्रमप्राप्त आहे. प्रस्तुत शिलालेखांच्या प्राप्तिस्थानांचा जिल्हानिहाय गोषवारा पुढीलप्रमाणे आहे.[२]

अनुक्रमांक	शिलालेखाचे उपलब्धिस्थान	जिल्हा	संख्या
१.	कार्ले	पुणे	१६
२.	शेलारवाडी	"	१
३.	नासिक	नासिक	१
४.	कान्हेरी	ठाणे	१
५.	पितळखोरे	औरंगाबाद	१

अशा प्रकारे धेनुकाकटाचा उल्लेख असलेल्या विसापैकी सतरा शिलालेख पुणे जिल्ह्यातील कार्ले-शेलारवाडी परिसरातील होत. या कसोटीच्या आधारे धेनुकाकट हे या परिसरातच असल्याचे सूचित होते. धेनुकाकट म्हणजे जुन्नर :—या परिसरात एवढी प्राचीन ऐतिहासिक परंपरा असलेले एकमेव ठिकाण म्हणजे जुन्नर. यावरून धेनुकाकट हे जुन्नरचे मूळ नाव असावे असे वाटते. पुढील बाबी या तर्कास पुष्टी देतात.

(१) शिलालेखांचा जो काळ आहे त्या काळातील २०० लेणी आणि ३६ ब्राह्मी शिलालेख जुन्नर परिसरात आहेत.[३]

(२) 'कल्पसमूह' या रसशास्त्रविषयक ग्रंथात महाराष्ट्रातील ज्या रसविद्यास्थानांचा उल्लेख आढळतो त्यात धेनुक्षेत्र हे एक स्थलनाम आहे.[४] ते नक्की कुठे होते याविषयी त्यात माहिती नाही, परंतु त्याच्या अगोदर उल्लेखिलेली रामसेज आणि मार्कण्डया पर्वत ही नावे धेनुक्षेत्र नासिक परिसरात असल्याचे सूचित करतात. नामसादृश्यावरून धेनुकाकट आणि धेनुक्षेत्र ही एकाच स्थलाची विविध नामरूपे असल्याचे जाणवते. 'रसार्णव' या रसविद्याविषयक प्राचीन मराठी ग्रंथात 'अंबिकाग्राम' नामक रसविद्या

केंद्राचे वर्णन आलेले असून तेही नासिकच्या दक्षिणेस असण्याची शक्यता डॉ. रा. चिं. ढेरे यांनी व्यक्त केली आहे.[५] धेनुक्षेत्र आणि अंबिकाग्राम एकाच स्थलाची विविध नावे असण्याची शक्यताही नाकारता येत नाही. रसार्णव ग्रंथात अंबिका ग्रामाजवळील 'श्वेत पाषाणा'च्या उल्लेखावरून ही सर्व स्थले जुन्नरच्या परिसरातील असावीत असे दिसते. कारण जुन्नरजवळील नाणेघाट येथील एका शिलालेखात तेथील एका पर्वतरांगेचे वर्णन 'श्वेतगिरी' या नावाने करण्यात आलेले आहे.[६] जुन्नर इथे अंबिकादेवीचे मंदिर असून या परिसरातील लेणी अंबिका लेणी म्हणून ओळखल्या जातात. यावरून धेनुकाकट म्हणजे जुन्नर होय हे स्पष्ट होते.

(३) पुराभिलेखीय आणि वाङ्मयीन साधनांच्या आधारे धेनुकाकट किंवा धेनुक्षेत्र हे पुणे आणि नासिकच्या दरम्यान असल्याचा संकेत मिळतो. याच परिसरात प्राचीन वैभवाचा वारसा बाळगणारे जुन्नर हेच एकमेव स्थान होय.

(४) पुराभिलेखीय आणि पुरातत्त्वीय साधनांच्या आधारे जुन्नरचे प्राचीनत्व इ. स. पू. दुसऱ्या शतकापर्यंत सिद्ध झालेले आहे. परंतु जुन्नर या नावाशी जुळणारे एकही स्थलनाम त्या काळातील कोरीव लेखात आढळत नाही. या स्थानाचा 'जुन्निनगर' असा उल्लेख करणारा एकमेव कोरीव लेख असून तोही इ. स.च्या दहाव्या शतकाच्या अखेरचा होय.[७] जुन्निनगर म्हणजे जुने नगर. मूळ स्थलनामापेक्षा ते विशेषणात्मक संबोधन वाटते. त्यामुळेच दहाव्या शतकापूर्वीच्या बारा शतकांच्या काळातील एकाही शिलालेखात ते आढळत नाही. यावरून जुन्नरचे मूळ नाव आजच्यापेक्षा वेगळे होते हे स्पष्ट होते. ते 'धेनुकाकट' किंवा 'धनकट' असल्याचा संकेत नासिक, जुन्नर आणि नाणेघाट येथील तत्कालीन कोरीव लेखांतून मिळतो.

(५) जुन्नर जवळील नाणेघाट येथील सातवाहन सम्राज्ञी नागनिका हिने कोरविलेला प्रदीर्घ शिलालेख या संदर्भात प्रथम विचारात घ्यावा लागेल.[८] त्यात नागनिकेच्या अनेक धार्मिक आणि दान कृत्यांची नोंद करण्यात आलेली आहे. त्यांपैकी गोदान हे प्रमुख होते. कारण या दानाची नोंद बावीस वेळा करण्यात आलेली आहे. विशेष म्हणजे जिथे जिथे गोदानाची नोंद आहे तीत गाईसाठी 'गौ' या शब्दाचे बहुवचन 'गावो' याचा प्रयोग करण्यात आलेला असून त्याबरोबर प्रत्येक गोदानातील गाईंची संख्या देण्यात आलेली आहे. प्रस्तुत शिलालेखातील बहुतेक अक्षरे नष्ट झालेली असल्यामुळे आपण ऐतिहासिक महत्त्वाच्या फार मोठ्या मजकुरास मुकलो आहोत. अक्षरे नष्ट झाल्यामुळे कित्येक शब्दांचे पूर्ण वाचन न झाल्यामुळे त्यांचा अर्थ लागू शकलेला नाही. प्रस्तुत शिलालेखाच्या सहाव्या आणि बाराव्या ओळीत 'धेनु' या दोन अक्षरांनी प्रारंभ होणारा शब्द आलेला आहे. त्याच्या पुढील अक्षरे फुटलेली असल्यामुळे पूर्ण शब्द काय होता हे समजण्यास मार्ग नाही. कै. म. म. मिराशींसारख्या प्रकांड पंडिताने या शिलालेखाचे संपादन केले आहे. परंतु 'धेनु' या शब्दावर त्यांनी टिप्पणी केलेली

नाही. कदाचित गोदानांच्या संदर्भात तो शब्द आला असावा असे त्यांना वाटले
असावे. परंतु गाय या अर्थाने तो वापरण्यात आलेला नाही हे निश्चित. कारण बावीस
वेळा आलेल्या गोदानाच्या उल्लेखात एकाही ठिकाणी 'धेनु' या शब्दाचा वापर
करण्यात आलेला नाही. दुसरी गोष्ट म्हणजे अशी की 'गावो'च्या प्रत्येक नोंदी बरोबर
दान दिलेल्या गाईंची संख्या नमूद करण्यात आली आहे. 'धेनु'च्या पुढे दोन्ही
ठिकाणी ती नाही. तिसरी आणि विशेष महत्त्वाची बाब म्हणजे जर 'धेनु' हा उल्लेख
'गाय' या अर्थाने वापरला असता तर 'गौ'च्या 'गावो' या बहुवचनाप्रमाणे 'धेनु'च्या
बहुवचनाचा वापर करावयास हवा होता. त्यावरून 'धेनु' ही 'धेनुकाकट' या स्थल-
नामाची पहिली दोन अक्षरे असण्याची शक्यता नाकारता येत नाही. कै. मिराशींच्या
मते सातवाहनांची प्रारंभीच्या काळातील राजधानी जुन्नर इथे होती. नागनिका ही
सातवाहन राजवंशाचा संस्थापक सिमुख याची स्नुषा व प्रथम सातकर्णीची पट्टराणी
होती. तिचा नाणेघाटातील लेख सातवाहनांच्या प्रारंभीच्या काळातील होय. सातकर्णी
आणि नागनिकेने केलेल्या अनेक यज्ञयागांची व दानाची त्यात नोंद करण्यात आलेली
आहे. त्या संदर्भात धेनुकाकट या त्यांच्या राजधानीचा उल्लेख येणे साहजिकच होय.

(६) याच शिलालेखात 'धान्यगिरी' या शब्दाचा दोन ठिकाणी उल्लेख आलेला
आहे. संपादकांनी त्याचा अर्थ 'धान्याच्या पर्वतप्राय राशी' असा घेतला आहे. लेख
खंडित झालेला असल्यामुळे त्यातील अनेक शब्दांचे अर्थ अंदाजाने घेण्यात आलेले
आहेत. 'धान्यगिरी' हे जुन्नरजवळील एका पर्वतमालेचे नाव असून त्यावरून या
स्थलाचे 'धान्यकटक' किंवा 'धनकट' असे नामकरण झाले असण्याची ही शक्यता
आहे. कारण नासिक येथील लेणे क्र. ३ मधील वाशिष्ठीपुत्र पुलुमावीच्या शिलालेखात
'धनकट' या स्थलनामाचा उल्लेख आलेला आहे.[९] डॉ. भगवानलाल इंद्रजी, बुल्हेर
आणि भांडारकरांनी त्या शब्दाचे वाचन 'धनकट समनेही' असे केले असून नासिक
येथील विहारात वास्तव्य करणाऱ्या धनकट येथील श्रमणांच्या विनंतीवरून पुलुमावीने
दान दिले असा अर्थ लावला आहे. सेनार्ट आणि मिराशींनी त्याचे 'बेनाकटसमनेही'
असे वाचन सुचविले असून मिराशींनी बेनाकटाची निश्चिती विदर्भाच्या भंडारा जिल्ह्या-
तील कन्हान नदीवरील स्थानाशी केली आहे. ब्राह्मी लिपीतील 'ब' आणि 'ध'
शब्दातील सारखेपणामुळे हा वाद निर्माण झालेला आहे. अशा वेळी संदर्भाशी
जुळणाऱ्या अर्थाचा विचार करावा लागतो. सेनार्ट आणि मिराशींना नासिक येथील
गौतमीपुत्र सातकर्णीच्या शिलालेखातील त्याच्या 'बेणाकटस्वामी' या विशेषणावरून
वरील 'बेनाकटसमनेही' हा पर्याय सुचलेला दिसतो.[१०] वादासाठी तो स्वीकारला तरी
बेनाकटाची मिराशींनी सुचविलेली भंडारा जिल्ह्यातील निश्चिती ग्राह्य वाटत नाही. कारण
शिलालेखातील उल्लेखावरून 'बेणा' या नावाच्या अनेक नद्या महाराष्ट्राच्या विविध
भागांत होत्या असे दिसते. दक्षिण महाराष्ट्रातील कृष्णवेण्या किंवा कृष्णा[११] आणि

कोकणांतील वारूबेण्णा[१२] किंवा वसईची खाडी त्यापैकी होत. विशेषतः वसईच्या खाडीचा ' बिण्डा ' असा उल्लेख टॉलेमीच्या भूगोलात आढळतो.[१३] गौतमीपुत्र सातकर्णीने नासिक–जुन्नर आणि कोकण शकांच्याकडून हस्तगत केल्याचा उल्लेख वरील शिलालेखात असल्यामुळे ' बेणाकटस्वामी ' म्हणजे ' कोकणचा स्वामी ' असा अर्थ अभिप्रेत आहे. त्याचा ' धनकट समनेही 'शी संबंध नाही. नासिक येथील विहारात वास्तव्य करणारे बौद्ध भिक्षू त्या परिसरातील असणेच अधिक संभवनीय होय. त्या आधारे ' धनकट समनेही ' हे वाचन ग्राह्य मानण्यास नासिक परिसरातील स्थलनामाच्या संदर्भात ते आलेले आहे असा निष्कर्ष निघतो. नाणेघाट शिलालेखातील ' धेनु ' आणि ' धान्यगिरी ' आणि नासिक शिलालेखातील ' धनकट ' हे उल्लेख एकाच स्थलनामाचे होत व ते स्थलनाम जुन्नर होय असा यातून अर्थ निघतो.

(७) जुन्नरचे मूळ नाव ' धनगर ' (धननगर किंवा धान्यनगर) असल्याचे खुद्द जुन्नर येथील एका शिलालेखावरून स्पष्ट होते. जुन्नर लेण्यातील हा एक त्रोटक दानलेख असून त्यात धनगर येथील सुवर्णकार श्रेणीद्वारा दिलेल्या दानाची नोंद करण्यात आलेली आहे.[१४] भगवानलाल इंद्रजींनी नामसादृश्याच्या आधारे या स्थलाची निश्चिती जुन्नरजवळील धनगरवाडीशी केली आहे. नामसादृश्य असले तरी एवढ्या प्राचीन काळातील अवशेष इथे आढळले नाहीत. दुसरी आणि विशेष महत्त्वाची बाब म्हणजे दान सुवर्णकारश्रेणीने केलेले असल्यामुळे ' धनगर ' हे व्यापार उदीमाचे केंद्र असलेले मोठे गाव असले पाहिजे. धनगरवाडी ही पूर्वी तशी असल्याचा एकही पुरावा तिथे मिळाला नाही. त्यामुळे ' धनगर ' हे जुन्नरचे जुने नाव असून ते धनगर किंवा धान्यनगर या नावाचे अपभ्रष्ट रूप असावे अशा निष्कर्षाप्रत यावे लागते.

(८) इ. स. च्या दुसऱ्या शतकातील टॉलेमीच्या ग्रीक जियाग्रॉफीमध्ये सोपारा, चेमूल्य (चौल जि. रायगड) या महाराष्ट्रातील तत्कालीन बंदरांचे आणि आंतरभागातील पैठण व तगर या व्यापारी पेठांचे वर्णन आढळते. या चारी ठिकाणांची स्थलनिश्चिती झाली आहे. सोपारा आणि चौलच्या दरम्यान ' डोउंग ' (Dounga) या एका व्यापारी पेठेचा उल्लेखही त्याच्या ग्रंथात आलेला आहे[१५], परन्तु या स्थलाची निश्चिती अद्याप होऊ शकलेली नाही. यूलच्या मते डोउंग म्हणजे ठाणे जिल्ह्याच्या भिवंडी तालुक्यातील ' दुग्गड ' हे गाव असावे. परन्तु तशी शक्यता वाटत नांही. कारण या दोहोंत भाषिक साम्यही नाही आणि दुग्गड या गावी त्या काळातील अवशेषही दिसत नाहीत. ' डोउंग ' हे उच्चारसाधर्म्याच्या आधारे धेनुकाकट या नावाशी अधिक जवळ आहे. धेनुकाकट म्हणजे जुन्नर असल्यामुळे टॉलेमीच्या काळात ती एक प्रमुख बाजारपेठ होती हे सिद्ध झाले आहेच. यावरून डोउंग म्हणजे धेनुकाकट किंवा जुन्नरच असावे असे वाटते. जुन्नर हे बंदर नसल्यामुळे हा तर्क दुबळा वाटण्याची शक्यता आहे. परन्तु टॉलेमीच्या ग्रंथातील कित्येक स्थलनामांच्या वर्णनातील विसंगती लक्षात घेता ही

बाब गौंण मानावी लागेल. उदा. त्याने या परिसरातील 'नन्नगुणा' नावाच्या नदीचा उल्लेख केला आहे. वास्तविक 'नन्नगुणा' ही नदी नसून जुन्नरजवळील नाणेघाट आणि गुणाघाट यांचा जोड नावाने केलेला उल्लेख होय हे डॉ. भाण्डारकरांनी दाखवून दिले आहे.[१६] टॉलेमीने नोंदविलेली बरीचशी माहिती ऐकीव स्वरूपाची होती. त्यामुळे त्याच्यात विसंगती येणे स्वाभाविक होते. 'डोउंग' हे सोपारा आणि चौलच्या मध्ये असल्याची माहिती टॉलेमीच्या ग्रंथात असली तरी ते बंदर होते किंवा आंतरभागातील पेठ होती याचा स्पष्ट उल्लेख त्यात नाही, विशेषतः धेनुकाकट येथे कित्येक यवन व्यापाऱ्यांचे वास्तव्य असल्याची माहिती या स्थलाचा उल्लेख असलेल्या शिलालेखा-वरून मिळते.[१७] जुन्नर येथील शिलालेखावरून तसेच तिथे सापडलेल्या एरॉस या ग्रीक देवतेच्या मूर्तीवरून तेथे ग्रीकांचे वास्तव्य असल्याचे सिद्ध होते.[१८] म्हणून 'डोउंग' म्हणजे धेनुकाकट अथवा जुन्नरच असण्याची शक्यता आहे.

वरील विवेचनावरून धेनुकाकट, धनकट आणि धननगर असे या स्थलनामाचे तीन पर्याय आपणासमोर येतात. हे एकाच स्थलनामाचे विविध पर्याय होत. आंध्र प्रदेशातील धान्यकटक देखील धम्नकटक, धन्नकटक, धान्यांकपूर आणि धन्नाद इत्यादी विविध पर्यायांनी शिलालेखात आलेले आहे. त्या स्थलनामाची व्युत्पत्ती 'धान्य' म्हणजे तांदूळ या धान्यापासून झाली असल्याचे मानण्यात येते.[१९] कारण आंध्र प्रदेशातील तो भाग तांदुळाच्या शेतीसाठी पूर्वीपासून प्रसिद्ध आहे. नाणेघाट शिला-लेखातील 'धान्यगिरी'च्या उल्लेखावरून जुन्नरचे मूळ नाव 'धान्यकटक' हेही तांदूळ या धान्यावरून पडले असावे. आजही कोकण आणि विदर्भ-मराठवाड्याचा पूर्व भाग वगळल्यास महाराष्ट्रात तांदूळ उत्पादनाच्या बाबतीत नावाजलेला भाग म्हणजे सह्याद्रीच्या पूर्वेकडील इगतपुरी-जुन्नर परिसर होय. 'धेनुकाकट' हा पर्याय या प्रदेशातील गोधनाचे निदर्शक होय. समकालीन शिलालेखातील 'गोवर्धन', 'गोपराष्ट्र' या स्थलनामावरून नासिक-जुन्नर परिसर गोधनासाठी विख्यात असल्याची साक्ष मिळते. सारांश, सातवाहनांची आद्य राजधानी जुन्नर त्या काळी धान्यकटक किंवा धेनु-काकट या नावांनी विख्यात होती हे स्पष्ट होते. या नावाशी असलेल्या आंध्र प्रदेशातील सातवाहनांच्या उत्तरकालीन राजधानीच्या विलक्षण साम्यावरून या दोहोत ऐतिहासिक कार्य-कारणभाव असल्याचे जाणवते. आंध्रप्रदेश सातवाहनांच्या अंमलाखाली आल्या-नंतर तेथील राजधानीचे नामकरण महाराष्ट्रातील या आद्य राजधानीच्या नावावरूनच झाले असावे. हे मान्य झाल्यास सातवाहन हे मूळचे आंध्रातील का महाराष्ट्रातील या वादावर पडदा पडण्यास हरकत नाही.

जुन्नर अथवा जुन्निनगर हे नामाभिधान धेनुकाकट नगरास प्राप्त होण्यामागे तत्कालीन राजकीय परिस्थिती कारणीभूत झाली असावी. नाणेघाटाच्या पूर्वेकडील पायथ्याशी हे नगर वसलेले असल्यामुळे व देशावरून कोकणात उतरण्याचा मुख्य मार्ग त्या काळी

नाणेघाटातून असल्यामुळे देश आणि कोकण यांना जोडणारे केंद्र म्हणून या नगराचे महत्त्व वाढत गेले. सातवाहनांची पहिली राजधानी झाल्यामुळे या शहरास राजकीय महत्त्व प्राप्त झाले. सातवाहनकाळात बहरास आलेल्या निर्यातप्रधान विदेश व्यापारामुळे रोमन साम्राज्यातील संपत्तीचा ओघ भारताकडे सुरू झाला. विदेशी व्यापाऱ्यांची आणि खलाशांची पश्चिम किनारपट्टीवरील वर्दळ वाढली राजधानी आणि आंतरभागातील मुख्य व्यापारी पेठ असल्यामुळे कित्येक यवन व्यापारी धेनुकाकट इथे स्थायिक झाले. शिलालेखातील धेनुकाकट येथील यवन व्यापाऱ्यांची नावे हेच सांगतात. राजघराण्यातील व्यक्ती आणि व्यापारी यांच्या पुढाकाराने जुन्नर-नाणेघाट परिसरातील लेणी कोरली गेली. अशा प्रकारे धेनुकाकटाचे वैभव वाढले.

शक-सातवाहनांच्या संघर्षात शकांनी पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण जिंकून त्या प्रदेशावर आपला अंमल प्रस्थापित केला. शक क्षत्रप नहपान आणि त्याचा जामात ऋषभदत्त याच्या जुन्नर, नाशिक व कार्ले येथील शिलालेखावरून ते सिद्ध झाले आहे. या वेळी बहुधा शकांनी धेनुकाकट हे नाव बदलून त्याचे ' मिन्ननगर ' (म्हणजे शकांचे नगर) असे नामांतर केले असावे. टॉलेमीच्या ग्रंथात ' ओमेनगर ' या पश्चिम महाराष्ट्रातील एका शहराचा उल्लेख असून ते शकांचे नगर असल्याची नोंदही त्यात करण्यात आली आहे.[२०] भाण्डारकरांच्या मते हे ' ओमेनगर ' आणि ' पेरिप्लस ' या दुसऱ्या ग्रीक ग्रंथातील नहपानाच्या राज्यातील मिन्नगर हे एकच असून ते जुन्नरचे शकस्वामित्वाच्या काळातील नाव होय. हा तर्क सयुक्तिक वाटतो. कारण इण्डो-ग्रीक राजा डेमिट्रियस याने सिंध प्रांत जिंकल्यावर तेथील मुख्य नगर पाटल याचे आपल्या नावावरून ' डेमिट्रियास ' असे नामांतर केले होते.[२१] विशेष म्हणजे या नगराचे भारतीयीकरण केलेले नाव ' दत्तामित्री ' नासिक येथील एका शिलालेखांत आले आहे.[२२] त्यावरून ' मिन्नगर ' किंवा ' ओमेनगर ' हे जुन्नरचे शक शासनकाळातील नाव असणे सहज शक्य आहे. याला आणखी पुरावा म्हणजे कार्ले येथील एका शिलालेखात ' उमेहनाकट ' येथील एका यवन व्यापाऱ्याने आपल्या दानाची नोंद केली आहे.[२३] या स्थलाचीही अद्याप निश्चिती झालेली नाही. नामसादृश्यावरून ते टॉलेमीचे ' ओमेनगर ' किंवा जुन्नरच असले पाहिजे. तसेच जुन्नर परिसरात अद्यापही मीना नावाची नदी असून तिच्या खोऱ्याला मिन्नेर असे म्हणतात. यावरून शकांच्या आमदानीत धेनुकाकटाचे मिन्ननगर झाले हे सिद्ध होते.

धेनुकाकट शकांच्या ताब्यात गेल्यामुळे सातवाहनांना प्रतिष्ठान (पैठण, जि. औरंगाबाद) इथे आपली राजधानी हलवावी लागली. गौतमीपुत्र सातकर्णीने शकांना महाराष्ट्रातून पिटाळून लावले. अर्थात पुढील काळात राजधानी पैठण इथेच राहिली. शकांची महाराष्ट्रातील सत्ता अल्पकालीन ठरल्यामुळे जुन्नरचे त्यांनी केलेले नामांतर रूढ झाले नाही. त्याऐवजी ते या काळात ' जुन्निनगर ' या विशेषणात्मक नावाने

संबोधले जाऊ लागले व कालान्तराने तेच त्यांचे नाव बनले असे दिसते. या ठिकाणी सातवाहन काळातील आणखी एका विशेषणात्मक स्थलनामाचा विचार करणे आवश्यक आहे. नासिक येथील क्र. ३ च्या लेण्यातील वाशिष्ठीपुत्र पुलुमावींचे वर्णन 'नवनगर स्वामी' असे करण्यात आले आहे.[२४] यावरूनही पुलुमावीची राजधानी होती हे स्पष्ट होते. काही संशोधकांनी नवनगर म्हणजे ठाणे जिल्ह्यातील कल्याण होय असे म्हटले आहे.[२५] परंतु त्याला काही आधार नाही. उलट टॉलेमीने पैठण ही पलुमावीची राजधानी असल्याचा स्पष्ट निर्देश आपल्या ग्रंथात केला आहे. त्या आधारे 'नवनगर' हे पैठणचे विशेषणात्मक नाव ठरते.

जुन्निनगर म्हणजे जुनी राजधानी आणि नवनगर म्हणजे नवी राजधानी पैठण. दोन्हीतील फरक दाखविण्यासाठी ही विशेषणात्मक नावे प्रचारात आली असावीत, धेनुकाकट हे जुन्नरचे मूळ नाव शक काळात बदलण्यात आल्यामुळे मागे पडले व परकीय सत्तेचा अंमल दर्शविणारे 'मिन्नगर' हे नाव सातवाहन सत्तेच्या पुनःस्थापनेनंतर आपोआपच गळाले. पैठणचे 'प्रतिष्ठान' हे नाव प्रचलित असल्यामुळे नवनगर हे केवळ विशेषण राहिले, उलट पूर्वीची नावे गळल्यामुळे 'जुन्निनगर' हे विशेषणात्म नावच जुन्नरचे खरे नाव बनले, असे दिसते. यात अशक्य असे काहीच नाही. प्राचीन काळी प्रमुख नगरे विशेषणात्मक नावांनी संबोधण्याची प्रथा संपूर्ण भारतात होती. उदा. पाटलिपुत्र=कुसुमपुर किंवा श्रीपुर, उज्जयिनी = विशाला, कान्यकुब्ज=महोदय, प्रतिष्ठान–सुप्रतिष्ठित,[२६] इत्यादी. या नगरांची मूळ नावे सर्वपरिचित असल्यामुळे त्यांची विशेषणे अल्पकालीन ठरली. याउलट काही नगरांच्या विशेषणांनी त्यांच्या मूळ नावाची जागा घेतल्याची उदाहरणेही आहेत. सौराष्ट्रातील गिरिनगर आज जुनागढ म्हणून ओळखले जाते तर कर्नाटकातील होयसळांची राजधानी द्वारसमुद्र आज हळेबीड म्हणून ओळखले जाते. हळेबीड म्हणजे जुनी राजधानी. जुनागढचाही तोच अर्थ होतो. ही दोन्ही विशेषणात्मक नावे असून आज त्या त्या स्थानांची मूळ नावे झाली आहेत. धेनुकाकट किंवा धान्यकटकाचे 'जुन्निनगर' होण्यामागे हीच पार्श्वभूमी आहे.

संदर्भ सूची

१. H. S. Thosar, Epigraphical glimpses of India's foreign Trade, Jr. of Epi. Soc. of Indla, Vol. XV. PP. 97–107.
२. शां. भा. देव, महाराष्ट्र आणि गोवे, शिलालेख व ताम्रपट सूची.
३. सुरेश जाधव, जुन्नर आणि शिवनेरी.
४. रा. चिं. ढेरे, चक्रपाणि, पृ. १९८–२००

५. कित्ता.
६. वा. वि. मिराशी, सातवाहन आणि पश्चिमी क्षत्रपांचे कोरीव लेख व इतिहास पृ. ६२. शि. ले. क्र. २३.
७. Epigraphica Indica, Vol. XXV. PP. 164–171.
८. मिराशी, पूर्वोक्त, शि. ले. क्र. ३.
९. उपरोक्त, क्र. १९.
१०. कित्ता.
११. Yazdani, Early History of the Deccan, P. 18.
१२. शां. भा. देव, पूर्वोक्त, क्र. ३२९
१३. Bombay Gaz. Vol. XIV Thane.
१४. Bombay GAZ. EETTER, Vol. XVIII under Junnar.
१५. Mc Crindle's Ancient India as described by Ptolemy, P. 42
१६. R. G. Bhandarkar Early History of the Deccan.
१७. Bombay Gaz. Vol. XVIII op. cit.
१८. सुरेश जाधव पूर्वोक्त. पृ. ४.
१९. Amita Ray, Life and Early Andhradesha, P. 22
२०. R. G. Bhandarkar op. cit.
२१. Thosar, Epigraphical Glimpses op. cit.
२२. कित्ता.
२३. कित्ता.
२४. मिराशी, पूर्वोक्त क्र. १९.
२५. Bombay Gaz. Vol. XIV op. cit.
२६. हरिहर ठोसर, भारतीय इतिहास आणि संस्कृती, जुलै ७६, पृ. ३८–५१.

ताम्रपाषाणयुगीन महाष्ट्रातील शेतीव्यवसाय

डॉ. वसंत शिंदे
डेक्कन कॉलेज, पुणे

महाराष्ट्रात शेतीव्यवसायाला सुरूवात सुमारे इ स. पूर्व २००० च्या दरम्यान ताम्रपाषाणयुगीन लोकांनी केली. आद्य शेतकऱ्यांच्या वसाहती मुख्यत्वे दख्खनच्या पठारावरती आढळून येतात (नकाशा १), कारण येथे शेतीयुक्त अशी काळी जमीन भरपूर उपलब्ध आहे. कदाचित शेतीस युक्त चांगली जमीन उपलब्ध नसल्यामुळे तसेच घनदाट अरण्ये व डोंगराळ भाग यामुळे कोकणात या लोकांच्या वसाहती आढळून येत नाहीत. विदर्भातसुद्धा या लोकांच्या वसाहती फारच तुरळक आहेत. त्याला काय कारण असावे हे सांगणे सध्यातरी कठीणच. दख्खनचे पठार हे भौगोलिक

दृष्ट्या शेतीस अनुकूल आहे. जरी येथे पावसाचे प्रमाण कमी असले तरी काळ्या जमिनीच्या पाणी शोषून साठवण करून ठेवण्याच्या गुणधर्मामुळे शेतीस तसा अडथळा निर्माण होत नाही. या भागात तीन महत्त्वाची खोरी आहेत; उत्तरेला तापीचे खोरे, मध्यभागी गोदावरीचे व दक्षिणेला भीमेचे. प्रत्येक खोऱ्यात काळ्या मातीच्या उपलब्धतेचे प्रमाण कमीजास्त असल्यामुळे वसाहतींच्या घनतेत फरक आढळून येतो. पहिली ताम्रपाषाणयुगीन वसाहत १९५० मध्ये जोर्वे (ता. संगमनेर, जिल्हा अहमदनगर) येथे सापडली व त्यानंतर आजपर्यंत करण्यात आलेल्या सर्वेक्षणामुळे जवळ जवळ ३०० वसाहती उजेडात आल्या आहेत. तापीच्या खोऱ्यात अतिशय सुपीक जमीन व भरपूर पाणीपुरवठा यामुळे निम्म्याहून अधिक वसाहती तेथे आढळतात.

त्या खालोखाल गोदावरी व सगळ्यात कमी वसाहती भीमेच्या खोऱ्यात आढळतात.

महाराष्ट्रात चार महत्त्वाच्या ताम्रपाषाणयुगीन संस्कृती मुख्यत्वे त्यांच्या रंगीत मातीच्या भांड्यांवरून, विशेषतः त्यांवरील नक्षीकामात व आकारात असलेल्या फरकांमुळे ओळखण्यात आलेल्या आहेत.[1]

(१) सावळदा संस्कृती (इ. स. पूर्व २०००–१८००)
(२) उत्तर सिंधू संस्कृती (इ. स. पूर्व १८००–१६००)
(३) माळवा संस्कृती (इ. स. पूर्व १६००–१४००)
(४) जोर्वे संस्कृती (इ. स. पूर्व १४००–७००)

ताम्रपाषाण युगीन शेतकरी हे मातीच्या आयताकृती किंवा गोल घरात राहात असत. तांब्याचा उपयोग त्यांना माहीत होता. त्याचप्रमाणे दगडापासून तयार केलेल्या छिलक्यांचा व घासून तयार केलेल्या हत्यारांचा नित्याच्या व्यवहारात उपयोग केला. मातीपासून तयार केलेल्या देवदेवतांच्या पूजेची प्रथा त्यांनीच सुरू केली होती. मृतदेह काळजीपूर्वक घराच्या अंगणात किंवा घराच्या जमिनीखाली पुरत असत. लहान मुलांना मातीच्या दोन कुंभात ठेवून पुरत असत तर मोठ्यांना कुंभाशिवाय. मोठ्या माणसांचे पुरण्यापूर्वी खालचे पाय कापत असत व कदाचित त्याचे भूतात रूपांतर होऊन घरातून पळून जाऊ नये हा त्यामागचा हेतू असावा. खड्ड्यात मृताबरोबर बरीचशी भांडी ठेवलेली आढळतात व कदाचित त्यामध्ये मृतासाठी अन्न-पाणी ठेवले असावे. हे जर सत्य असेल तर त्या लोकांचा मरणोत्तर जीवनावर विश्वास असावा असे अनुमान काढता येते.

१. जास्त माहितीसाठी पाहा वसंत शिंदेलिखित "मध्य तापीच्या खोऱ्यातील शेतकरी व त्यांची वसाहत रचना," संशोधक १९८६.

जमीन नांगरट

दख्खनच्या पठाराचा बराचसा भाग सुपीक काळ्या मातीने व्यापला गेलेला आहे व त्यामुळेच शेतीचा उदय या भागात झाला. काळ्या मातीचा चिकणपणा व टणकपणा या गुणधर्मामुळे प्रसिद्ध इतिहासकार कोसांबी यांनी असे विधान केले की, लोखंडी अवजारांशिवाय ह्या जमिनीची नांगरट करणे शक्य नाही (Kosambi 1963) व म्हणूनच ताम्रपाषाणयुगीन शेतकऱ्यांनी काळ्या मातीत शेती केली नसावी. अग्रवाल यांना वाटते की या लोकांनी नदीच्या गाळापासून तयार झालेल्या मातीतच शेती केली असावी (Agrawal 1982:218) परन्तु पानिक्कर यांनी केलेले निरीक्षण या विरुद्ध आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार दख्खनच्या पठारावरील व मध्यप्रदेशातील नद्या उंचावरून येऊन खोल दऱ्यातून वाहात असल्यामुळे पुराचे पाणी क्वचितच किनाऱ्याबाहेर पसरते व त्यामुळे तेथे गाळाची जमीन तयार होत नाही (Panikkar 1959:37). १८८८ मध्ये एक ब्रिटिश शेतीतज्ज्ञ वॅलेस हे या भागात फिरत असताना काळ्या मातीतील गुणधर्मामुळे अतिशय प्रभावित झाले होते. त्यांच्या म्हणण्यानुसार काळी माती ही स्वतःच स्वतःची नांगरट करते. थंडीच्या दिवसांत दंव आत्मसात केल्यामुळे माती फुगते व उन्हाळ्यात आकसली जाते. ह्या प्रक्रियेमुळे जमीन भुसभुशीत होते व बारीक माती तयार होते (Wallace 1888–180-81)

'भुसभुशीत जमिनीची नांगरट करण्यासाठी एक लहानसे अवजार जसे कुदळी पुरे होते. जुन्या पद्धतीने शेती करणारे भिल्ल तर पालापाचोळा जाळून नांगरट न करताच धान्य पेरतात. अशा प्रकारे वरील विधानातील सत्यता पटल्यामुळे कोसांबी यांनी केलेले विधान न पटणारे वाटते.

नांगरणीची हत्यारे

ताम्रपाषाणयुगीन लोकांना तांब्याचा वापर माहीत होता, परन्तु त्याच्या दुर्मिळतेमुळे त्याचा वापर केवळ लहान हत्यारे, मणी व बांगड्या करण्यापुरताच सीमित होता. लोखंडी नांगराच्या अभावी यांनी काळ्या मातीत शेती केली असणार यात शंका नाही व नांगरटीच्या कामी लाकडी नांगराचा उपयोग केला असावा. सध्या ह्या भागात तसेच मध्य प्रदेशमध्ये काही गरीब शेतकरी अजूनही लाकडी नांगराचा उपयोग करतात व त्या कामी टणक व लवकर न झिजेल अशा खैर लाकडाचा उपयोग करतात.

भारतात सर्वप्रथम नांगराचा उपयोग ४५०० वर्षांपूर्वी सिंधू संस्कृतीच्या लोकांनी केला. लाकडाचे नांगर शिल्लक नाहीत; परन्तु भाजलेल्या मातीपासून तयार केलेल्या नांगराच्या प्रतिकृती मोहेन-जो-दरो (पाकिस्तान) व बनावली (जि. रोपर, हरियाणा) येथील उत्खननात सापडलेल्या आहेत. आपल्याकडील राकट हवामानात लाकडी

किंवा तत्सम वस्तू थोड्याच अवधीत नष्ट होतात. सिंधू संस्कृतीच्या अगोदरच्या काळांतील (इ. स. पूर्व २४५०) प्रत्यक्ष नांगरट केलेले शेत राजस्थानमध्ये काळीबंगन या ठिकाणी सापडले आहे. कालीबंगन हे लुप्त झालेल्या सरस्वती या नदीकिनारी वसलेले तत्कालीन मोठे शहर होते. येथे मिळालेला पुरावा हल्ली प्रचलित असलेल्या उभी व आडवी नांगरटी सारखाच आहे. एक नांगरट पूर्व-पश्चिम दिशेने असून दुसरी उत्तर-दक्षिण आहे. पूर्व-पश्चिम दिशेने असलेल्या दोन नांगरटीमधील अंतर ३० सें. मी. असून उत्तर-दक्षिण दिशेने असलेल्या नांगरटीमधील अंतर मात्र ११० सें. मी. आहे. सध्या या प्रदेशात प्रचलित असलेल्या शेती पद्धतीमध्ये चण्याचे पीक घेण्यासाठी जवळ जवळ व मोगरीच्या पिकासाठी दूर दूर नांगरट करणे अवश्य आहे. एकाच वेळी दोन पिके घेण्याची प्रथा अशा प्रकारे सिंधु संस्कृतीच्या लोकांनी सुरू केली.

महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन वसाहतींच्या उत्खननांमध्ये मोठ्या प्रमाणात गोल आकाराचे मध्ये भोक असलेले तयार केलेले दगड मिळतात. अशा प्रकारचे दगड खोदकामासाठी वापरावयाच्या काठीच्या टोकाला वजन व दिशा मिळावी म्हणून अडकविण्याची जास्त शक्यता आहे. त्याचप्रमाणे लांब जाड दगडाची तयार केलेली पाती नांगराचे फाळ म्हणून वापरण्याची बरीच शक्यता आहे. डोंगराच्या उताराचर जेथे वेगळ्या प्रकारची बाजरी वाढविणे शक्य आहे परंतु जेथे नांगराचा नांगरणीसाठी उपयोग होत नाही अशा ठिकाणी कुदळीचा उपयोग करणे योग्य ठरते. ताम्रपाषाणयुगात अशा कुदळीचा फार मोठ्या प्रमाणात वापर झाला असावा–असे पुराव्यांवरून म्हणणे इष्ट ठरेल. इनामगाव (ता. शिरूर, जिल्हा पुणे) येथील उत्खननात सांबराच्या शिंगाच्या दोन कुदळी मिळाल्या आहेत (फोटो १) अशा प्रकारची सांबराची शिंगे युरोपमध्ये (नॉरफोल्क, इंग्लंड) सापडली आहेत व त्यांचा उपयोग भूगर्भातून फ्लींट नावाचा दगड, जो हत्यारे करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वापरत, खोदून काढण्यासाठी वापरली असावीत असा विद्वानांचा कयास आहे (Clark 1952:177). येथे हत्यारे करण्याचा चालसिडोनी नावाचा दगड नदीच्या पात्रात भरपूर उपलब्ध असल्यामुळे, अशा कुदळींचा उपयोग शेतीसाठीच केला असावा. येथे एका गोष्टीचा विचार करणे आवश्यक आहे की जरी कुदळीने जमिनीची नांगरट करणे शक्य असले तरी फारच मर्यादित क्षेत्रात शेती करणे शक्य आहे. -

पाटबंधाऱ्याची व्यवस्था

दख्खनचे पठार, जेथे ताम्रपाषाणयुगीन शेतीला सुरुवात झाली, पर्जन्यछायेच्या प्रदेशात मोडते. येथे वार्षिक पर्जन्य सर्वसाधारण ५०० ते ७५० मि. मी च्या दरम्यान पडतो, परंतु हा पाऊस अनिश्चित असल्यामुळे शेतकऱ्यांना वारंवार दुष्काळाशी सामना करावा लागतो. कदाचित अशा प्रकारच्या दुष्काळांना तोंड देण्याची वेळ

ताम्रपाषाणयुगीन शेतकऱ्यांना आली असावी आणि म्हणूनच त्यांनी शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी पाटबंधाऱ्याची व्यवस्था केली होती. कालव्याचा पुरावा इनामगाव येथे मिळाला असून भारतातील तो सर्वांत प्राचीन पुरावा आहे.

इनामगाव व दायमाबाद (ता. श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर) येथील उत्खननात मिळालेल्या पुराव्यावरून हे सिद्ध होते की स्थिर पद्धतीय समाजाची सुरुवात महाराष्ट्रात सुमारे इ. स. पूर्व १४०० च्या दरम्यान झाली. उत्खननामध्ये शेतकरी, गावाचा म्होरक्या (Chief of the Community), कुंभार, तांबट, सोनार, मणी बनविणारे तसेच दगडाची हत्यारे बनविणारे यांची घरे ओळखण्यात आली आहेत. तसेच अनेक सार्वजनिक बांधकामे, जसे गावाभोवती तटबंदी व खंदक, कालवे, धान्याचे कोठार, वगैरे सुचवितात की समाजामध्ये म्होरक्याचे स्थान महत्त्वाचे होते. सार्वजनिक बांधकाम करून घेणे फक्त म्होरक्यालाच शक्य असते. म्होरक्या कामगारांवरती नियंत्रण, पाण्याचे वाटप, धान्याच्या स्वरूपात कर वसुली व वाटप करू शकतो.

इनामगाव येथील ताम्रपाषाणयुगीन वसाहत घोडनदीच्या वळणात वसलेली असून पुराचे पाणी वस्तीपर्यंत पोहोचत असावे असे वाटते. पुराचा धोका टाळण्यासाठी त्यांनी वसाहतीपासून ३०० मीटर्स अंतरावर एक मोठा कालवा खोदून पुराचे पाणी परस्पर वळविण्यात त्यांना यश आले होते. कालवा मध्यभागी मुद्दाम खोल खोदण्यात आला होता. पूर ओसरून गेल्यावर मध्यभागी शिल्लक राहिलेले पाणी त्यांनी गव्हाचे पीक काढण्यासाठी वापरले. इनामगाव येथील उत्खननात जळालेल्या गव्हाचा पुरावा मिळालेला आहे. ह्या भागात गव्हाचे पीक केवळ कालव्याच्याच पाण्यावर काढता येते. हा कालवा इ. स. पूर्व १४०० च्या दरम्यान जोर्वे संस्कृतीच्या लोकांनी खोदला होता. हा कालवा आता भरून गेला असून आता फक्त लांब काळ्या मातीचा पट्टा दिसतो. हा पट्टा साधारण पूर्व-पश्चिम दिशेने असून तो जवळ जवळ २४० मी. लांब व २·५ मी. रुंद आहे. हा कालवा मातीने भरून जाऊ नये म्हणून त्याला लागून एक दगड-मातीचा बंधारा (Embankment) बांधण्यात आला होता. वरील पुराव्यावरून हे स्पष्ट होते की ताम्रपाषाणयुगीन लोकांच्या अभियांत्रिकी ज्ञानाला त्या काळी तोड नव्हती. याशिवाय लहान लहान नद्यांना बांध घालून शेतीसाठी पाणी पुरवण्याची व्यवस्था त्यांनी केली असावी. तापीच्या खोऱ्यातील तापीच्या उपनद्या या अशा प्रकारे बांध घालण्यासाठी अगदी योग्य आहेत.

पिके

इनामगाव व दायमाबाद येथील उत्खननात मिळालेल्या जळलेल्या धान्यावरून या लोकांनी खालील पिके काढली असतील.

(१) सातू (५) चणा

(२) गहू	(६) पावटा
(३) तांदूळ	(७) उडीद
(४) कुळीथ	(८) मूग वगैरे

वर नमूद केलेल्या पिकांवरून हे स्पष्ट होते की ताम्रपाषाणयुगीन शेतकरी शेती जिरायत व बागायत दोन्ही पद्धतीने करत होते. सर्व पिकांमध्ये सातूचे पीक त्या काळी अतिशय महत्त्वाचे व मुख्य होते कारण सातूला एक तर पाणी कमी लागते व दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे पीक केवळ ६० ते ७० दिवसांत तयार होते.

अनुमान

काही विद्वानांनी आपल्या अभ्यासाच्या आधारे काढलेल्या अनुमानावरून हे सिद्ध केले आहे की एका विशिष्ट प्रदेशात तेथे उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीपेक्षा जास्त लोकसंख्या वाढली तर उपजीविकेसाठी शेतीकडे वळल्याशिवाय गत्यंतर नसते (Boserup 1965; Cohen 1978). इ. स. पूर्व २००० च्या दरम्यान महाराष्ट्रात दख्खनच्या पठारावर काहीशी अशा प्रकारची परिस्थिती निर्माण झाली होती. काही कारणांमुळे लोकसंख्येत प्रचंड वाढ झाली व तेथे असलेली नैसर्गिक संपती कमी पडू लागली. त्यामुळे या लोकांनी शेतीला सुरुवात केली असावी. शेतीमुळे साहजिकच माणसाच्या आयुष्यात महत्त्वाचे बदल घडून आले. स्थिर जीवनामुळे खेडी गावे उदयास येऊ लागली. शेतीव्यतिरिक्त दुसऱ्या जीवनावश्यक वस्तू तयार करण्यासाठी काही लोकांनी स्वतःला वाहवून घेतले व त्या कारागिरांचा एक वर्ग तयार झाला. ताम्रपाषाणयुगीन शेतकऱ्यांची शेती करण्याची पद्धत, त्यांची हत्यारे ही जवळ जवळ हल्लीच्या शेतकऱ्यांसारखीच होती. गावापासून जर शेत दूर असेल तर तेथे लागवडीच्या व सुगीच्या वेळी वस्ती करून राहण्याची पद्धत त्यांनीच सुरू केली. या लोकांनी कुदळीशिवाय लाकडी नांगराचा नक्कीच उपयोग केला असावा; त्याशिवाय त्यांना मोठा भाग लागवडीखाली आणणे शक्य झाले नसते (Shinde 1987).

ताम्रपाषाणयुगीन शेतकऱ्याने लाकडी नांगराच्या सहाय्याने काळ्या मातीत शेती केली असली तरी लोखंडी प्रभावी नांगराच्या अभावे मात्र त्यांना मोठ्या प्रमाणात उत्पादन काढणे शक्य झाले नसावे व म्हणूनच त्या काळी मोठ्या शहरांचा उदय झाला नाही. इ. स. पूर्व १०००च्या दरम्यान हवामानात बदल घडून आला. हवामान जास्त शुष्क व पावसाचे प्रमाण एकदम कमी झाले. साहजिकच या सर्वांचा परिणाम शेतीवर व पर्यायाने मानवी जीवनावर झाला. त्यांच्या तापी व गोदावरी खोऱ्यातील वसाहती नष्ट झाल्या व फक्त भीमेच्या खोऱ्यात इनामगाव येथे ते इ.स.पूर्व ७०० पर्यंत तग धरून होते परंतु त्यांना दरिद्रयावस्थेत जगावे लागले. सर्व खोदलेले कालवे व खंदक बुजून गेले.

संदर्भ ग्रंथ

Agrawal, D. P. (1982)
The Archaeology of India. London, Curson Press.
Boserup, Eaoter (1965)
The conditions of Agricultural Growth : Chicago Aldine
Clarke, J. G. D. 1952.
Prehistoric Europe : The Economic Basis. London : Cambridge University Press.
Cohen, M. N. 1977.
The Food Crisis in Prehistory : Over Population and Origins of Agriculture. New Haven & Londn : Yale University Press.
Kosambi D. D. 1963.
The beginning of Iron Age in India.
Journal of the Social and Economic History of Orient, VI : 309-318.
Panikkar, K. N. 1959
Geographical Factors in Indian History Bombay : Bharatiya Vidya Bhavan.
Shinde Vasant. 1987
Farming in chalcolithic Deccan, India. C. 2000–1000 B.C. *Tools and Tillage*, Vol V. 4, 214–227.
Wallace, Robert. 1888.
Indian in 1887. Edinburg : Oliver and Boyd.

विदर्भातील पहिला शेतकरी

प्रा. डॉ. ग. का. माने
मराठी महाविद्यालय, हैदराबाद

विदर्भात शेतीची सुरुवात केव्हा झाली यासंबंधीचे विवेचन करण्यासाठी आपल्याला पूर्वापार चालत आलेल्या संस्कृतींचा विचार करावा लागेल. तसेच भौगोलिक रचनेमुळे झालेल्या बदलांची दखल घ्यावी लागेल.

विदर्भाचे स्थूलमानाने दोन भाग पाडता येतात. चंद्रपूर, भंडारा व नागपूरचे पठार आणि वर्धा–पूर्णेचे खोरे. त्यातील चंद्रपूर, गडचिरोली आणि भंडारा जिल्ह्यात ग्रॅनाईट खडक आढळतो तर इतरत्र बसाल्ट दगड सापडतो. शिवाय नागपूर पठार आणि पश्चिम विदर्भात चंद्रपूर भंडारा जिल्ह्याच्या तुलनेत पाऊस कमी पडतो आणि जंगलाचे

व खाणींचे (कोळसा, लोखंड, तांबे) प्रमाण अधिक आहे.

अशा भौगोलिक प्रदेशात सर्वांत प्राचीन अश्मयुगाचे अवशेष वैनगंगेच्या खोऱ्यात, पापासिया टेकडी इ. ठिकाणी आढळतात. परंतु नव्या अश्मयुगीन संस्कृतीचे पुरावे मात्र नगण्य आहेत, असे पुरातत्त्वीय समन्वयाच्या पुराव्यावरून लक्षात येते. मांढळ, आडम, नैकुंड, कौंडिन्यपूर या ठिकाणी नवाश्मयुगीन अवशेष सापडले, परंतु आजपर्यंत स्तरीय संदर्भात (Stratigraphy) नैकुंड आणि कौंडिन्यपूर,[1] सोडल्यास कुठलाही पुरावा प्राप्त होऊ शकला नाही. विदर्भात आजपर्यंतच्या उपलब्ध पुराव्यांच्या आधारे नवाश्मयुगीन संस्कृतीचे वसतिस्थान आढळले नाही.

नवाश्मयुगामध्ये मानवी जीवनात अत्यंत महत्त्वाचे बदल झाले. हा काळ मानवी संस्कृतीच्या उत्क्रांतीचा एक महत्त्वपूर्ण कालखंड समजला जातो. या काळात अन्न-संचयनाच्या अवस्थेतून अन्न उत्पादन, प्राण्यांना माणसाळण्याची प्रक्रिया, मृद्‌भांडी तयार करण्यासाठी चाकाचा शोध, नैसर्गिक घरापासून मातीच्या घराकडे वाटचाल आणि दगडांची धारदार घासून गुळगुळीत केलेली हत्यारे इत्यादी घटना मानवी उत्क्रांतीच्या संदर्भात महत्त्वपूर्ण मानल्या जातात.

कुठल्याही मानव इतिहासात पुराश्मयुग–आंतराश्म–नवाश्मयुग–ताम्रकांस्ययुग–लोहयुग अशा प्रकारच्या तंत्रज्ञानाच्या पायऱ्या ओलांडूनच आधुनिक युगात पोहोचला आणि या पायऱ्यांचे कालखंड कमी जास्त झाले पण पायऱ्या चुकल्या नाहीत. (Taxonomic development) असे मानले जाते. परंतु विदर्भाच्या बाबतीत चित्र वेगळे आहे. नवाश्म आणि ताम्रपाषाणयुगाचे अवशेष फारच अल्प-स्वल्प मिळाल्या-मुळे (उदा. ताम्रपाषाणयुगाचे अवशेष चंद्रपूर जिल्ह्यातील मसाला तुकूम, अमरावती जिल्ह्यातील तुळजापूरगढी तसेच स्तरीय संदर्भात नैकुंड व कौण्डिन्यपूरला नवाश्म-युगाचे अवशेष सापडले.[2] खऱ्या अर्थाने ताम्रपाषाणयुगीन व नवाश्मयुगीन संस्कृतीचे लोक या भागात राहायला आले नाहीत. शिवाय स्तरीय संदर्भात सापडलेले अवशेष बृहदश्मयुगीन (Megalithic culture) संस्कृच्या संपर्कात आल्याने, त्या देवाण–घेवाणीतून बृहदश्मीय लोकांनी त्या आणल्या असाव्यात. अशा प्रकारचे सांस्कृतिक संपर्क दाखविणारे अवशेष अनेक (विदर्भाव्यतिरिक्त) उत्खननातून प्राप्त झाले आहेत. पण एवढे निश्चित की, कौण्डिन्यपूर येथील उत्खननानंतर, असाही काहीसा जो समज झाला होता की, दक्षिणेतील इतर भागाप्रमाणे येथे नवाश्म–ताम्रपाषाण संस्कृतीने स्थिर जीवनाचा पाया घातला (Settled life) तो चुकीचा आहे. ज्या कुठल्या अर्थाने स्थिर म्हणता येईल, उदा. शेतीप्रधान जीवन, त्या अर्थाने स्थिर संस्कृतीचा पाया बृहदश्मीय लोकांनीच घातला. या संदर्भात विदर्भातील बृहदश्मयुगीन संस्कृती ही नवाश्म–ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीप्रमाणे काहीशी पशुपालन व काहीशी शेतीप्रधान होती हे लक्षणीय आहे.

उत्खननात प्राप्त झालेल्या पुराव्याच्या आधारे आपल्याला त्याच्या जीवनमापनांचे चित्र उभे करता येते. या काळातील गृहरचना ही ताम्रपाषाणयुगाप्रमाणे नसून (दफन–वसतिस्थान) एक तर दफन स्थळापासून वसतिस्थान दूरवर, किंवा दोहोंच्या मध्यभागी नाला किंवा नदी झाड असलेल्या ठिकाणी असते. यामागे त्यांच्या धार्मिक कल्पना अंतर्भूत असाव्यात. वसतिस्थानाच्या व्याप्तीविषयी फारशी माहिती नसली तरी उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे टाकळघाट येथील वसाहतीची व्याप्ती २२,५०० चौ. मीटर, नैकुंड १,००,००० चौ. मी., भागीमाहिरी ८२,००० चौ. मी. आणि खैरवाडा १,०७,००० चौ. मी. आहे. दुसरे असे की विदर्भातील नागपूर व चंद्रपूर जिल्ह्यातील काही क्षेत्रातील दोन बृहदश्मीय स्थळांतील अंतर हे १५ कि. मी. पेक्षा जास्त नाही.[३] त्यामुळे त्यांचा सतत सांस्कृतिक संपर्क वाढत असावा. लोकसंख्येच्या बाबतीत आपल्याला खैरवाड्याचा उल्लेख करावा लागेल. एकट्या खैरवाड्याल १४९६ बृहदश्मयुगीन शिळावर्तुळांची नोंद करण्यात आली. जर ही एकाच वसतिस्थानाशी निगडित असली तर तेथील लोकसंख्येच्या मोठेपणाची आणि गावाच्या आकाराची कल्पना येईल. यावरून आपल्याला असे सांगता येते की (इ. स. पू. ६ ते इ. स. पू. १० वे शतक) या कालखंडात विदर्भात अनेक वसाहती झाल्या त्या प्राथमिक स्वरूपाच्या असल्या तरी स्थैर्य प्राप्त झाले होते.

उत्खननात प्राप्त झालेल्या पुराव्याच्या आधारे या वसाहतीच्या शेतीप्रधान व पशुपालन अवस्थेस दुजोरा मिळतो. हे लोक गुरे व बकऱ्यांचे मोठे मोठे कळप पाळीत असत. याचा अंदाज पुढील तक्त्यावरून बांधता येतो.[४]

प्राण्याचे नाव	टाकळघाट	नैकुंठ	बोरगाव	भागीमाहिरी
गुरे	६३·८८%	७०·७%	५४·४%	६१·८%
म्हैस	६·९८%	२·६%	१·९८%	३·१%
बकरा	१४·९६%	९·६%	१३·६७%	१६·२%
मेंढी	३·१०%	—	२·८९%	४·१%
डुक्कर	६ २३%	३·८९%	२·२७%	३·४%
घोडा	०·३४%	४·०%	१·२८%	१·२३%

शिवाय यापैकी बैल व गाय यांचा उपयोग आहारासाठी केला जात होता. बऱ्याच हाडावर तेज धार असलेल्या शस्त्रांनी कापल्याच्या खुणा आढळल्या तसेच काही हाडे जळालेल्या अवस्थेत आढळली. बकरी व मेंढीचा आहारात समावेश होता, हे उघडच. परंतु म्हैस किंवा घोड्यांचा समावेश आहारात होता किंवा नाही याबद्दल स्पष्ट पुरावा उपलब्ध झाला नाही. हरीण किंवा चितळ याचा समावेश होता.

अन्नामध्ये गहू, उडीद, बोर यांचा समावेश होता. विदर्भात (भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली जिल्हे वगळता) गव्हाचे पीक घेतले जाते. या संदर्भात नैकुंठ येथील पुरावा लक्षणीय आहे.[५]

कृषीच्या अवजारांचा अभ्यास केल्यास एकंदरीत शेतीची कल्पना येते. माहुरझरी व नैकुंड येथे शेतीची अवजारे सापडली. त्यात खुरपी, कुदळ, वाकसचा समावेश आहे. याशिवाय अनेक बृहदश्मीय स्थळात कोयते सापडले. तसेच कामठी येथे फाळ मिळाल्याचा वृत्तांत आहे.[६]

या सर्व पुराव्यावरून आपल्याला अनुमान काढता येते, की गुरे आणि शेळ्या मेंढ्यांचे प्रमाण पाळीव प्राण्यांत जास्त होते. तसेच आतापर्यंत उपलब्ध झालेल्या वृत्तान्तानुसार शेतीला लागणारी उपकरणे ही शिकारीला उपयोगी पडणाऱ्या शस्त्रांच्या तुलनेत (बोरगाव १३%, टाकळघाट ३७%) कमी आहेत. यावरून या संस्कृतीचे लोक भटक्या जमातीसारखे असून गुराढोरांचे कळप पाळीत असावेत. शेती ही पावसावर अवलंबून असल्यामुळे पिकाची हमी कमीच; त्यामुळे पशुपालन उद्योगाकडे लक्ष घातले असावे.

या संस्कृतीच्या लोकांचा वंशीय अभ्यास केल्यानंतर असे लक्षात येते, की नवाश्म-युगात इतरत्र आढळणाऱ्या दोन मानवसमूहांबरोबर आणखी एका मानवसमूहाचा समावेश झालेला आढळतो. (प्रोटाएस्ट्राईड, मेडीटेरीनीयन आणि तिसरा शक-इराणी) शक–इराणी, यानेच खऱ्या अर्थाने बृहदश्मयुगीन संस्कृतीत कृषिप्रधान जीवनाचा पाया घातला व इतर दोन समूहांनी कालाच्या ओघात आपल्याला सामावून घेतले.

विदर्भात शेतीची सुरुवात ही आजपासून ३,००० वर्षापूर्वी (इ. स. पू. १०००) झाली असे आता कार्बन १४च्या तारखांच्या आधारे सांगता येते व याच मानवसमूहाने विदर्भात शेतीला सुरुवात करून पहिल्या शेतकऱ्याचा मान मिळविला.

संदर्भ वाङ्मय

(१) नैकुंड एक्स्कॅवेशन पृ. ३४ एक्स्कॅवेशन ॲट कौण्डिन्यपूर, पृ. १३२
(२) माने, ग. का. दक्खनमधील बृहदश्मीय संस्कृती, (अप्रकाशित प्रबंध), नागपूर विद्यापीठ, नागपूर, पृ. १४६-४७

(३) देव, शां. भा, इन्टरनॅशनल कॉन्फरन्स ऑफ रिसेन्ट ॲडव्हान्सेस इन ऑर्किऑलॉजी (साजक्लोस्टाईल प्रत) पृ. १–२.
(४) माने ग. का. पूर्वोक्त, पृ. १९५.
(५) माने, ग. का. विदर्भातील बृहदश्मयुगीन संस्कृती नागपूर-अमरावती विद्यापीठ इतिहास परिषद, १९८६ (सायक्लोस्टाईल प्रत), पृ. ३–४
(६) माने, ग. का. 'विदर्भातील पहिला शेतकरी' नागपूर–अमरावती विद्यापीठ इतिहास परिषद १९८७ (यवतमाळ), पृ. २.

•

॥ श्रीविश्वनाथो विजयते ॥

इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ वृत्त

(१) **दिवाळी अंक योजना :** या वर्षी मंडळाच्या वाचनालय विभागाने ८१ दिवाळी अंक वाचण्यासाठी ठेवले. दोन महिन्यांसाठी रु. ३०/– वर्गणी भरून ३५ जणांनी तर ३ जणांनी रु. १५/– एका महिन्याची वर्गणी भरून या योजनेचा लाभ घेतला.

(२) **वैशिष्ट्यपूर्ण भेटी :** हैदराबादच्या उस्मानिया विद्यापीठातील मराठी विभाग-प्रमुख डॉ. व. दा. कुलकर्णी ह्यांनी संशोधनाच्या निमित्ताने मंडळास भेट देऊन मंडळातील फारशी व उर्दू भाषेतील कागदपत्रांचा अन्वयार्थ लावण्यात त्यांचे बहुमोल सहकार्य लाभले. त्यांच्या समवेत बेल्जियम विद्यापीठातील डॉ. डब्ल्यू. एम. कॉलिवाट यांनी मंडळास भेट देऊन येथील कामाची प्रशंसा केली.

अन्य भेटी : मुंबई येथील आयुर्वेद विज्ञान मंडळाचे कार्यवाह डॉ. कु. के. कानिटकर, त्रिवेंद्रमचे श्री. के भद्रकुमार, मराठी विज्ञान परिषदेचे श्री. वाशीकर, शैक्षणिक तंत्र-विज्ञान विभागाचे मूल्यमापन अधिकारी श्री. अशोक लेंभे, सौ. सोहोनी, धुळे येथील कै. का. स. वाणी, प्रगत मराठी अध्ययन केंद्राच्या सहाध्यायी अश्विनी देशपांडे, विजय वाटे, बबनराव मांजरेकर, धुळे येथील जो. रा. सिटी हायस्कूलच्या संस्कार वर्गातील विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांनी मंडळास भेटी दिल्या.

(३) **पुणे येथील दक्षिण भारतीय इतिहास परिषद :** ह्या परिषदेला मंडळाचे प्रमुख चिटणीस प्रा. डॉ. प्र. न. देशपांडे व संशोधक-सहाय्यिका सौ. विजया देशपांडे हे दोघे गेले होते. या परिषदेत मंडळातर्फे मूळ मोडी कागदपत्रे व पोथ्या ठेवण्यात आल्या होत्या. मंडळाच्या अभिलेखागार विभागास परिषदेचे उद्घाटक महाराष्ट्राचे राज्यपाल मा. श्री. ब्रह्मानंद रेड्डी ह्यांनी भेट देऊन व मूळ कागदपत्रे पाहून समाधान व्यक्त केले.

८६५

॥ श्रीविश्वनाथो विजयते ॥

राजवाडे मंडळ प्रकाशने

मंडळाकडे विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या दुर्मिळ ग्रंथांची यादी

		पृष्ठे	उपलब्ध प्रती	रुपये
१.	राजवाडे मराठी धातुकोष	३१६	१९	५०
२.	राजवाडे नामादी व्युत्पत्तिकोश	३३८	१०२	५०
३.	ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायाचे संस्कृत रूपांतर (वि. का. राजवाडे)	१८३	१०	२०
४.	राजस्थान महाराष्ट्र संघर्ष (शु. पु. जोशी)	१९१	४५	३५
५.	राजवाडे चरित्र (भा. वा. भट)	६२४	२७	५०
६.	मराठ्यांच्या इतिहासाची साधने (मो. रा. जोशी)	३८७	५०	५०
७.	ऋग्वेदातील ज्योतिषमूलक कालनिर्णायक गमके	१०४	३०	१२
८.	संस्कृत भाषेचा उलगडा (वि. का. कुळकर्णी)	२१०	११९	२५
९.	ज्ञानेश्वरी पदकोश (श्री. शिवाजीराव भावे)	५१६	५०	१००
१०.	ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे व्याकरण	१२६	५०	१०
११.	विलासमणिमंजरी (प्राचीन काळातील गंजीफा खेळाची माहिती देणारा ग्रंथ)	८३	८३	१०
१२.	ऐतिहासिक लेखचर्चा – भाग ४ था	२२१	२५	३५
१३.	चर्चात्मक निबंध	२२८	६८	४०
१४.	ऐतिहासिक चर्चा ग्रंथ १६	२४८	३६	३५
१५.	पंचीकृत विवेक – प्राचीन मराठी गद्यग्रंथ गरीबनाथ स्वामीकृत	१०३	२७	१०
१६.	जानकीसैंवर (सं. द. रा. भट)	२८८	१००	३०
१७.	आज्ञापत्र (ऑफसेट प्रिंट) मूळ हस्तलिखित	—	३००	२०
१८.	अमृतानुभव (ऑफसेट प्रिंट) मूळ हस्तलिखित	—	३००	४०
१९.	योग चिंतामणी (ऑफसेट प्रिंट)	—	३००	४०
२०.	वेडिया नागेश (सं. डॉ. मु. ब. शाह)	७३	३००	१०
२१.	शिवछत्रपतींची १०९ कलमी बखर	७४	३००	१०

॥ श्रीविश्वनाथो विजयते ॥

राजवाडे मंडळ प्रकाशने

मंडळाकडे विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या दुर्मिळ ग्रंथांची यादी

		पृष्ठे	उपलब्ध प्रती	रुपये
२२.	‘नवरस रागमाला’ इब्राहिम आदिलशाह द्वितीय लिखित (सं. डॉ. पंढरीनाथ रानडे)	१२९	१५०	१२
२३.	संशोधक ‘सुवर्ण महोत्सवी अंक’	३२३	२००	४०
२४.	संशोधक ‘हीरक महोत्सवी अंक’	२२५	१८०	४५

२५. छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे (डॉ. प्र. न. देशपांडे) पृ. ३००, उपलब्ध प्रती २००, किंमत ६५ रुपये.

विशेष सवलत : वरील २५ पुस्तकांचा संच किंमत रु. ८४४ चा केवळ रु. ६५० ला मिळेल. दोन अगर अधिक ग्रंथ घेणाऱ्यास १५ टक्के कमिशन. टपाल खर्च वेगळा.

संशोधक त्रैमासिक : इतिहास संस्कृती संशोधनाला वाहिलेले दर्जेदार त्रैमासिक गेली ५६ वर्षे अविरतपणे प्रकाशित होत आहे. **जानेवारी १९८९ पासून वार्षिक वर्गणी रु. ३५ करण्यात आली आहे.** या **वर्षापासून प्रत्येक अंकाची किंमत १० रु. राहील.** वर्ष १ ते २९ वर्षातील अंक उपलब्ध नाहीत. वर्ष ३० ते ५६ वर्षांतील उपलब्ध असलेल्या सर्व अंकांचा संच केवळ रुपये ४०० त उपलब्ध. (त्यात सुवर्ण महोत्सवी अंक, कॉंग्रेसशताब्दी विशेषांक, हीरकमहोत्सवी अंक, योग चिंतामणी, आज्ञापत्र यांचा समावेश आहे.)

१ ऑक्टोबर १९८८

मुख्य चिटणीस
इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ
धुळे ४२४००१